# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १७९) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंगळवार, दि.१४ जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## जेव्हा भाजपकडे काहीच नव्हते तेव्हा खडसेंनी पक्षासाठी जीव लावून काम केले-सुधीर मुनगंटीवार

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- भाजप पक्ष वाढवण्यात गेल्या ४० वर्षात अनेक नेत्यांचे योगदान लाभले आहे. त्यापैकी एकनाथ खडसे एक आहेत. ४० वर्षे त्यांनी भाजपच्या विस्तारासाठी काम केले. काही चुका झाल्या असतील, म्हणून अमित भाई शहा ंनी काही चर्चा केली असती तर मला माहित नाही. नेते-कार्यकर्ते जीव लावून काम करत होते. काळाच्या ओघात काही घटना घडल्या आणि ते पक्षाच्या बाहेर गेले. आपल्या घरचे लोक बाहेर जाण योग्य नाही. त्यांना परत पक्षात घ्यायचे का नाही याबद्दल राष्ट्रीय नेतृत्वाने निर्णय घ्यावा, असे वक्तव्य भाजपचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी केले. ते सोमवारी नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

भाजप वाढवण्यासाठी योगदान दिले त्यापैकी एक खडसे साहेब आहेत. काही अडचणी निर्माण झाल्या. ते पक्षाच्या बाहेर गेले. जेव्हा पक्षात काही नव्हतं, त्यावेळी ज्यांनी जीव लावून पक्षासाठी काम केलं, त्यापैकी एक खडसे साहेब आहेत. ते बाहेर गेले तेव्हा मी म्हटलं होतं की, पक्ष वाढेल मोठा होईल. पण घरचे लोक बाहेर जाणं काही योग्य नाही, असे सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले.

यावेळी सुधीर मुनगंटीवार यांनी देवेंद्र फडणवीस केंद्रात जाणार असल्याच्या चर्चाबाबतही बोलले. त्यांनी म्हटले की, देवेंद्र फडणवीस सर्वाधिक काळ राज्याचे मुख्यमंत्री राहिले आहेत, यासाठी त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. ते अनेक वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहावे, ही सदिच्छा आहे. त्यांनी वारंवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले पाहिजे, असेही सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले.

## भरधाव ट्रकच्या धडकेत तीन वारकरी महिलांचा मृत्यू; सात जण जखमी

### सासवड-जेजुरी मार्गावर माऊलींच्या वारीला गालबोट

पुणे दि.१३ (प्रतिनिधी)- संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा सासवड येथील मुक्काम आटोपून जेजुरीच्या दिशेने मार्गस्थ होत असताना एका भरधाव ट्रकने सांगली जिल्ह्यातील कसबे डिग्रज येथील दिंडीत पायी चालणाऱ्या वारकरी महिलांना जोरात धडक दिल्याने झालेल्या अपघातात सांगलीतील तीन महिला वारकऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर सहा जण जखमी झाले. सासवड-जेजुरी रस्त्यावरील बेलसर टोल नाक्यापासून जेजुरीच्या बाजूला सुमारे ५०० मीटर अंतरावर असलेल्या 'हॉटेल शिपदीप लॉजिंग'समोर (भोंगळे मळा) हा अपघात घडला. नांदेड जिल्ह्यातील लोहा येथील रंगनाथ महाराज पोखरबिशीकर यांच्या दिंडीतील ट्रकने धडक दिल्याने हा अपघात झाला.

नंदा पवार (वय ६०, कवलापूर, ता. मिरज, जिं सांगली), माधवी राजाराम सालगरे (वय ५५, मालगाव, ता. मिरज, जिं. सांगली), राजश्री शंकर भोसले (वय ५५, कसबे डिग्रज, ता. मिरज, जि. सांगली) अशी अपघातात मृत्युमुखी पडलेल्या तिघींची नावे आहेत. तर निवृत्ती उमाजी जगताप, मंगल विलास पाटील, शैलजा दिनकर जगताप, नारायण महादू पडवळ, कासाबाई शंकर गस्ते रा.आष्ठा (सांगली), आक्काताई बबन कोळी,रा. शिरगाव (सांगली), गीताबाई सदाशिव हंकारे,रा.कसबेदिग्रज (सांगली),असे सातजण गंभीर रित्या जखमी झाले आहेत. जखमी महिलांना उपचारासाठी जेजुरी येथील आयसीयू रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातातील जखमींपैकी दोन महिलांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना तातडीने पुढील उपचारासाठी पुण्यातील ससून रुग्णालयात हलविण्यात आले आहे. याशिवाय, अन्य ५ किरकोळ जखमी वारकऱ्यांना उपचारासाठी तातडीने आनंदी ट्रस्ट येथे दाखल करण्यात आले असून, त्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे.

आषाढी वारीसाठी संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाली. रविवारी माऊलींच्या पालखीचा सासवडमध्ये मुक्काम होता. सकाळी पालखी सोहळा सासवडहून जेजुरीच्या दिशेने मार्गस्थ झाला. माऊलींच्या पालखीचा पहिला विसावा बोरावके मळा येथे असतो. त्यानुसार सोहळा मार्गक्रमण करत होता. पालखी पुढे अनेक दिंड्या, वारकरी तसेच भाविक होते. प्राथमिक माहितीनुसार नांदेड जिल्ह्यातील लोहा येथील रंगनाथ पोखरबिशीकर यांच्या दिंडीतील एक ट्रक भरधाव वेगात जात होता. हा ट्रक पालखी सोहळ्यासाठी शिधा घेऊन जात होता. मात्र, यादरम्यानच चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटले आणि वाहन थेट दिंडीत घुसले. या वाहनाने सांगली जिल्ह्यातील कसबे डिग्रज येथील दिंडीतील पायी चालणाऱ्या वारकरी महिलांना जोरदार धडक दिली. त्यात तीन वरील महिला वारकऱ्यांचा जागीचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिस,





जिल्हा प्रशासन आणि आपत्कालीन यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. स्थानिक नागरिकांनी व सहकाऱ्यांच्या साह्याने तातडीने मदतकार्य सुरू करण्यात आले. त्यानंतर जखमींना रुग्णालयात पोहोचवून रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करण्यात आला.

ट्रक चालकाचे वय सुमारे ७० वर्षे होते. मुख्य म्हणजे हा चालक आजारी होता. त्याला ताप, कणकण व सर्दी होती. त्यामुळे त्याने तापाच्या गोळ्या घेतल्या होत्या. त्याला ग्लानी आल्याने त्यात हा अपघात झाल्याचा प्राथमिक संशय आहे.

अपघातात जखमी झालेल्या एका महिला वारकऱ्याने थरकाप उडवणारा प्रसंग सांगितला. 'आम्ही रस्त्याच्या कडेने चालत होतो. अचानक पाठीमागून मोठा ट्रक भरधाव वेगात आला. काही समजण्याआधीच त्याने अनेकांना धडक दिली. लोक एकामागोमाग एक खाली पडत गेले आणि ट्रक काहींच्या अंगावरूनच पुढे निघून गेला. सगळीकडे आरडाओरडा सुरू झाला. पण सगळं संपलं होतं.' असं सांगताना या महिलेचा हुंदका दाटून आला.

पोलिसांनी अपघाताचा पंचनामा केला असून ७० वर्षीय ट्रक चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऐन पालखी सोहळ्यात तीन वारकरी महिलांचा असा करुण अंत झाल्याने पालखी सोहळ्याला दु:खाचे सावट पसरले आहे.

या घटनेमुळे पुणे ग्रामीण पोलिसांच्या नियोजनावर आणि ढिसाळ कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. (पान ४ वर)

## महागाईने सर्वसामान्यांचे बजेट कोलमडणार, इंधन आणि अन्नधान्य महागले

नवी दिल्ली दि.१३ (वृत्तसंस्था)- जशी भीती व्यक्त केली जात होती, अगदी त्याप्रमाणेच सर्वसामान्य ग्राहक, पगारदारांची चिंता वाढेल असे गंभीर वळण परिस्थितीने घेतले आहे. भारतातील किरकोळ महागाई दर जूनमध्ये ४.३८ टक्क्यांपर्यंत वाढला, असे सरकारी आकडेवारीतून सोमवारी स्पष्ट झाले. यामुळे १७ महिन्यांत प्रथमच रिझर्व्ह बँकेसाठी सहनशील असलेल्या ४ टक्क्यांच्या लक्ष्य पातळीला या दराने ओलांडले आहे. या आकड्यांमागील अधिक गंभीर बाब अशी की, व्याजदर वाढीच्या चक्रासाठी मार्ग मोकळा करणारा हा संकेत मानला जात आहे.

ग्राहक किंमत निर्देशांकावर बेतलेला हा किरकोळ महागाई दराचा आकडा अर्थतज्ज्ञांच्या अंदाजापेक्षा काहीसा जास्तच असून, जानेवारीमध्ये भारताने ग्राहक किंमत निर्देशांकाच्या गणनेत सुधारणा केल्यापासून महागाई दराची चढती भाजणी सुरू राहत त्याने आता सर्वोच्च स्तर गाठला आहे. देशाची मध्यवर्ती बँक अर्थात रिझर्व्ह बँकेने जूनमध्ये आपला प्रमुख व्याजदर ५.२५ टक्क्यांवर अपरिवर्तित ठेवला. परंतु पुरवठ्यामुळे निर्माण होणाऱ्या दबावांच्या दूरगामी परिणामांवर लक्ष ठेवून, आर्थिक वर्षासाठीचा महागाई दराचा अंदाज मात्र पूर्वीच्या ४.६ टक्क्यांवरून ५.१ टक्क्यांपर्यंत वाढवला. इराणमधील युद्धामुळे निर्माण झालेला पुरवठ्यातील व्यत्यय आणि मोसमी पावसाला झालेला विलंब यांमुळे इंधन आणि अन्नधान्याच्या किमती वाढल्या, ज्यामुळे महागाई दरातही वाढ झाली आहे. उल्लेखनीय म्हणजे मध्यंतरीच्या तात्पुरत्या युद्ध विरामानंतर, रविवारपासून अमेरिका आणि इराणच्या सैन्यामध्ये क्षेपणास्त्रे आणि ड्रोनद्वारे जोरदार हल्ले पुन्हा सुरू झाले असून, महत्त्वाचे म्हणजे होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा बंद केल्याचे जाहीर केले गेले आहे. भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा कच्च्या तेलाचा आयातदार असून, त्याचा पुरवठा पुन्हा मोठ्या प्रमाणात बाधित होण्याची भीती आहे.

सरलेल्या मे महिन्यात आयात होणाऱ्या खनिज तेलाच्या किमती कडाडल्यामुळे, सरकारी मालकीच्या इंधन विक्रेत्या कंपन्यांनी चार वेळा दरवाढ केली, ज्यामुळे जूनमध्ये वाहतूक क्षेत्रातील महागाई ४.३१ टक्क्यांपर्यंत वाढली, जी मे महिन्यातील १.७५ टक्क्यांच्या वाढीपेक्षा अधिक जलद होती.

## लाडकी बहीण योजनेतील १२ लाख नावे वगळली

### सत्ताधारी विरोधकांत टीकेचा कलगीतुरा रंगला

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- निवडणूक तोंडावर असताना सरकारने लाडकी बहीण योजनेसाठी कोणत्याही अटी-शर्ती लावल्या नाहीत. मात्र, आता निवडणूक संपताच हे सरकार पूर्णपणे मस्तीत आले असून, विविध जाचक अटी लागू करून महिलांना या योजनेतून वगळण्याचे पाप करत आहे. या योजनेतून तब्बल १२ लाख महिलांची नावे वगळण्यात आली असून, आगामी निवडणुकीत सत्ताधारी पक्षाचे लोक जेव्हा या महिलांकडे मतदान मागायला जातील, तेव्हा महिला त्यांना नक्कीच जाब विचारतील, असा थेट इशारा काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी दिला आहे. तसेच, सरकारच्या तिजोरीत पैसे नसून, मोक्याच्या सरकारी जमिनी कवडीमोल भावाने उद्योजकांच्या घशात घातल्या जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफी योजनेत इतक्या अटी व शर्ती घालण्यात आल्या आहेत की, तिचा लाभ केवळ १२ ते १५ लाख शेतकऱ्यांनाच होणार आहे. या निकषांमुळे बहुतांश शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार असून, सामान्य शेतकऱ्यांना जो त्रास व्हायचा तो होणारच आहे. जर केवळ मोजक्याच लोकांना याचा फायदा होणार असेल, तर सरकार याला सरसकट कर्जमाफी कसे काय म्हणू शकते? असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, जे लोक आयकर भरतात, त्यांना कर्जमाफीतून वगळण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. शेतकऱ्यांकडून फॉर्म नंबर १६ भरून घेतला जातो. वास्तविक पाहता कंत्राटी पद्धतीने काम करणारे कर्मचारी, अंगणवाडी सेविका, पोलीस पाटील आणि तंटामुक्ती अध्यक्ष हे देखील हा फॉर्म भरतात, परंतु त्यांचे प्रत्यक्ष उत्पन्न काहीच नसते. अशा लाखो गरीब (पान ४ वर)

## इराणवर जोरदार हल्ला करू; ट्रम्प यांची धमकी

वॉशिंग्टन दि.१३ (वृत्तसंस्था)- अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला धमकी दिली आहे की, जर त्यांनी अंतरिम कराराचे उल्लंघन करणे सुरूच ठेवले, तर त्यांना 'खूप मोठा फटका' बसेल. ट्रम्प यांनी आरोप केला की, इराणने अंतरिम करार मोडला आहे आणि आता त्यांना त्याची किंमत मोजावी लागेल. फॉक्स न्यूजला दिलेल्या मुलाखतीत ट्रम्प यांनी सांगितले की, अमेरिका होर्मुझच्या सामुद्रधुनीवर नियंत्रण मिळवेल. 'आम्ही या सामुद्रधुनीचे रक्षक असू. आम्ही तिचे रक्षण करू आणि त्यासाठी आम्हाला मोबदला मिळाला पाहिजे.' असे ते म्हणाले. ट्रम्प यांनी इराणला कडक लष्करी कारवाईचा इशारा दिला आहे. व्हाईट हाऊसच्या माहितीनुसार, ट्रम्प म्हणाले की इराणने अंतरिम करार मोडला आहे, त्यामुळे आता अमेरिका त्यांना जोरदार लक्ष्य करेल. 'करार झाला होता, पण त्यांनी तो मोडला. ते नेहमीच असे करतात. आम्ही त्यांच्यासोबत १० करार केले आणि प्रत्येक वेळी त्यांनी ते मोडले. आता आम्ही त्यांच्यावर जोरदार हल्ला करू असा इशारा त्यांनी इराणला दिला. दरम्यान इराणच्या लष्कराच्या खतम अल-अंबिया मुख्यालयाच्या प्रवक्त्याने सांगितले की, अमेरिकेला होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये हस्तक्षेप करण्याची परवानगी दिली जाणार नाही. त्यांनी सांगितले की, या सामुद्रधुनीची सुरक्षा आणि संचालन हा इराणचा विशेषाधिकार आहे आणि कोणताही बाह्य हस्तक्षेप स्वीकारला जाणार नाही. होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या सुरक्षेची आणि संचालनाची जबाबदारी अमेरिका घेऊ शकते, असा दावा ट्रम्प यांनी केल्यानंतर हे विधान आले आहे.

## राज्यातील अनेक जिल्ह्यात असमाधानकारक पाऊस; एल निनोचा प्रभाव

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- राज्यातील अनेक भागांमध्ये अद्यापही समाधानकारक पावसाची प्रतीक्षा कायम आहे. जुलै महिना अर्धा संपत आला तरी, राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये अपेक्षित पाऊस झालेला नाही. पुढील किमान पाच दिवस राज्यात पावसाची शक्यता नाही, असं भारतीय हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी सांगितले.

मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाची मोठी तूट नोंदवली गेली आहे. लातूर, बीड, परभणी, यवतमाळ तसेच सोलापूर जिल्ह्यांमध्ये पावसाची आकडेवारी सरासरीपेक्षा कमी असून तूट कायम आहे. पुढील पाच दिवसांमध्येही बहुतांश भागात मान्सूनला अपेक्षित असा जोर मिळण्याची शक्यता नाही, अशी माहिती भारतीय हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी दिली.

जुलैच्या सुरुवातीला मुंबई, कोकण, पुणे आणि घाटमाथा परिसरात चांगला पाऊस झाला. मात्र, उर्वरित महाराष्ट्र अजूनही चांगल्या पावसाच्या प्रतीक्षेत आहे. पावसाअभावी अनेक भागांतील शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. यंदाच्या मान्सूनवर एल निनोच्या परिणामाचाही प्रभाव जाणवत असल्याचे चित्र आहे.

हवामान प्रणाली कमकुवत झाल्याने पावसाची विश्रांती पाहायला मिळत आहे. घाटमाथ्यावर ५०० मिलिमीटर वरून पाऊस थेट शून्यावर आला आहे. पुढील पाच-सहा दिवस मुसळधार पावसाची शक्यता नाही. गेल्या आठवडाभर पुणे शहर, घाटमाथा आणि कोकणात मुसळधार बरसलेल्या पावसाने गेल्या दोन ते तीन दिवसांपासून अचानक विश्रांती घेतली आहे. काही दिवसांपूर्वी घाटमाथ्यावरील अनेक ठिकाणी ५०० ते ६०० मिलिमीटर पावसाची नोंद झाली होती. मात्र,गेल्या ४८ तासांत या भागातील बहुतांश भागांत पावसाची नोंद थेट शून्यावर आली आहे. ही परिस्थिती अनपेक्षित नसून, विविध हवामान प्रणाली कमकुवत झाल्याने पावसाचा जोर कमी झाल्याचे भारतीय हवामानशास्त्र विभागाने स्पष्ट केले आहे. याआधी सलग चार ते पाच दिवस घाट परिसरातील अनेक ठिकाणी अतिवृष्टी झाली होती.

## बारमध्ये पार्टी सुरु असतानाच आग लागल्याने २७ जणांचा कोळसा, ६० जण होरपळले

बॅकॉक दि.१३ (वृत्तसंस्था)- थायलंडची राजधानी बँकॉक येथील एका बारमध्ये रविवारी रात्री भीषण आग लागली, ज्यात २७ जणांचा मृत्यू झाला आणि ६३ जण जखमी झाले. थाई अधिकाऱ्यांच्या मते, विद्युत प्रणालीतील बिघाडामुळे ही आग लागली असावी. सर्व जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आगीच्या कारणाचा तपास सुरू आहे. अग्निशमन दलाने सांगितले की, त्यांना मध्यरात्री बाराच्या सुमारास फोन आला. सुमारे ३० मिनिटांच्या प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले, पण तोपर्यंत इमारतीचा मोठा भाग जळून खाक झाला होता.

घटनास्थळी असलेल्या एका संगीतकाराने सांगितले की, वीज जाण्यापूर्वी काही वेळ आधी, स्टेजजवळील एका सर्किट ब्रेकरमधून धूर निघताना दिसला. त्यानंतर एक स्फोट झाला आणि संपूर्ण बार काही क्षणातच धुराने भरून गेला. त्याने सांगितले की, अनेक लोकांनी जीव वाचवण्यासाठी इमारतीच्या मागील बाजूस असलेल्या शौचालयात धाव घेतली, जिथे गुदमरून त्यांचा मृत्यू झाला. थायलंडचे पंतप्रधान अनुतिन चर्नविराकुल यांनी घटनास्थळी भेट दिली आणि सांगितले की सर्व मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत.

## धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा का घेत नाही?; कॉकरोचच्या आंदोलनाला उद्धव ठाकरेंचा जाहीर पाठिंबा

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- ''नीट पेपरफुटीमुळे देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात गेले आहे. विद्यार्थी आत्महत्या करत आहेत, पण सरकारला इतर पक्ष फोडण्यातून वेळ मिळत नाही. जंतरमंतरवर सोनम वांगचुक आणि युवक करत असलेल्या आंदोलनाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा पूर्ण पाठिंबा आहे,'' अशी स्पष्ट भूमिका उद्धव ठाकरे यांनी आज मांडली. मातोश्रीवर आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी केंद्र सरकार, शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान आणि भाजपवर जोरदार हल्लाबोल केला.

तसेच, आगामी संसद अधिवेशनात या मुद्द्यावर आवाज उठवणार असल्याचे सांगत त्यांनी सर्वपक्षीय खासदारांना माणुसकीची आठवण करून देत या आंदोलनाला पाठिंबा देण्याचे भावनिक आवाहन केले आहे.

लडाखचे पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या जंतरमंतरवरील आंदोलनाला पाठिंबा देताना उद्धव ठाकरे म्हणाले, ''सोनम वांगचुक यांचे गेल्या १६ दिवसांपासून प्राणांतिक उपोषण सुरू आहे. त्यांची प्रकृती वेगाने खालावत आहे. चार दिवसांपूर्वी मी खासदार अरविंद सावंत यांना त्यांच्या भेटीसाठी पाठवले होते. मी स्वतः वांगचुक यांच्याशी फोनवर बोलून उपोषण सोडण्याची विनंती केली. पण सरकारला अशा व्यक्ती स्वतःहून संपत असतील, तर तेच हवे आहे, असे नाईलाजाने म्हणावे लागते.''

ते म्हणाले, ''२०१८ साली गंगा नदीच्या स्वच्छतेसाठी जी. डी. अगरवाल यांनी ११५ दिवस उपोषण केले, त्यात त्यांचे प्राण गेले. पण सरकारने दखल घेतली नाही. आज वांगचुक यांचीही तीच अवस्था सरकार करत आहे.''

नीट पेपरफुटी प्रकरणावरून शिक्षणमंत्र्यांवर निशाणा साधताना ठाकरे म्हणाले, ''एखाद्या व्यक्तीकडून एखादे काम नीट होत नसेल आणि त्यामुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य बरबाद होत असेल, तर त्या व्यक्तीला बदलायला काय हरकत आहे? शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेऊन तिथे एखाद्या सक्षम व्यक्तीची नियुक्ती केली, तर यात सरकारला कमीपणा का वाटतो?'' ''पालकांनी आयुष्याची पुंजी लावून मुलांना शिकवले, पण एका पेपरफुटीमुळे सर्व बरबाद झाले. पेपरफुटीचे सर्वाधिक धागेदोरे आणि अटका महाराष्ट्रात झाल्या आहेत. तरीही सरकारला याची चिंता नाही. ते परदेशात फिरण्यात आणि भाडोत्री लोक आणून स्वतःचे स्वागत करून घेण्यात मग्न आहेत.''

संसदेच्या आगामी अधिवेशनाबाबत आणि राज्यसभेतील खासदारांना उद्देशून उद्धव ठाकरे यांनी एक अत्यंत भावनिक आणि थेट आवाहन केले. संसदेचे अधिवेशन २० तारखेला सुरू होत आहे. आमचे खासदार हा प्रश्न संसदेत उचलतीलच. पण मी सर्व पक्षांच्या, अगदी भाजपच्या खासदारांनाही आणि राज्यसभेतील सदस्यांना उद्देशून सांगतो की, ''मी तुम्हाला सवाल विचारत नाहीये, तर विनंती करत आहे. जर तुमच्यात थोडीशी तरी माणुसकी बाकी असेल, तर कृपया या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला तुमचे समर्थन द्या असे ते म्हणाले.

## एसटीच्या जागांवर खाजगीकरणचा घाट

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) डेपोच्या पुनर्विकासातून उत्पन्न वाढवून महामंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्यात यावी. प्रत्येक डेपोची क्षमता लक्षात घेऊन स्वतंत्र विकास आराखडा तयार करावा. तसेच, सार्वजनिक-खाजगी भागीदारीच्या माध्यमातून पुनर्विकासाला गती देण्यासाठी आवश्यक धोरणात्मक प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली परिवहन विभागाची बैठक वर्षा या शासकीय निवासस्थानी झाली. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, नियोजन विभागाच्या सचिव ए.शैला, महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, एसटी डेपो विकसित करतांना प्रत्येक डेपोची व्यावसायिक क्षमता लक्षात घेऊन स्वतंत्र नियोजन करण्यात यावे. आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य प्रकल्पांमधून प्राप्त होणारा निधी एस्क्रो खात्यात जमा करून त्याचा वापर इतर विकास प्रकल्पांसाठी करण्यात यावा. सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) धोरणांतर्गत विकासकांना देण्यात येणाऱ्या सवलतींबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

## इथेनॉलमुळे पेट्रोल-डिझेल आयात करणारी लॉबी माझ्यावर नाराज, माझ्याविरोधात पेड कँपेन चालवलं जातंय-नितीन गडकरी

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी पुन्हा एकदा इंधनातील इथेनॉल वापराचे जोरदार समर्थन केले आहे. भारत दरवर्षी २२ लाख कोटींचे इंधन आयात करतो. इथेनॉल वापरामुळे त्याला पर्याय मिळेल, असे ते म्हणाले. सोशल मिडीयावर सुरु असलेली टीका हे पेड कँपेन आहे आणि इंधन आयातदार लोकांकडून ते चालवले जात आहे, असा आरोप त्यांनी केला.

आपल्या देशात दरवर्षी आपण २२ लाख कोटी रुपयांचं फॉसिल फ्युएल म्हणजे पेट्रोल,डिझेल आणि गॅस आयात करतो. मी केंद्रीय परिवहनमंत्री असल्यामुळे सांगतोय की, देशातील ४० टक्के वायू प्रदूषण हे वाहनांमुळे होते. इराण आणि अमेरिका युद्धामुळे आपल्यावर काय परिस्थिती ओढवली हे सगळ्यांना माहिती आहे. आपण आत्मनिर्भर भारत झालं पाहिजे, देशात पर्यायी इंधन किंवा बायोफ्युएल तयार झालं पाहिजे याचा मी २००४ पासून पाठपुरावा करत आहे. मी केवळ इथेनॉलचं बोलत नाही. माझ्याकडे इथेनॉल, हायड्रोजन गाडी आहे. या देशात मी इलेक्ट्रिक वाहने आणली, इलेक्ट्रिक कार बाईक आणि ट्रॅक्टर आणला. भारत ऑटोमोबाईल क्षेत्रात जगातील सातव्या क्रमांकाचा देश होता. पर्यायी इंधन किंवा बायोफ्युएलमुळे आपण तिसऱ्या नंबरपर्यंत पोहोचलो, जपानला मागे टाकलं. इथेनॉलबाबत माझ्याबाबत जो प्रचार होतो आहे, ते पेड कँपेन आहे, असे नितीन गडकरी यांनी सांगितले.

देशात दरवर्षी १५०० कोटी लिटर इथेनॉल लागते. इंधनात इथेनॉलचा वापर सुरु होण्यापूर्वी आम्ही आमच्या कारखान्यात अल्कोहोल तयार करायचो. इथेनॉलचा दर सरकार ठरवते, सरकार टेंडर काढून ते विकत घेते. पुढील पाच ते सहा महिन्यांत आपल्या देशातील शेतकरी एव्हिएशन फ्युएल म्हणून विमानांना इंधन पुरवतील. शेतकरी अन्नदाता नव्हे इंधनदाता होईल, असा दावा नितीन गडकरी यांनी केला.


## सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवडीला पक्षातूनच आक्षेप; ज्येष्ठ नेत्यानं पाठवली कायदेशीर नोटीस

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- एकीकडे शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महायुतीत सहभागी होणार असल्याच्या चर्चा सुरू असतानाच दुसरीकडे अजित पवारांच्या राष्ट्रवादीत देखील सर्वकाही आलबेल असल्याचं दिसून येत नाही. यापूर्वी, अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून प्रफुल पटेल यांचे नाव चर्चेत आल्यानंतर, राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांकडून त्यास विरोध झाला होता. त्यानंतर, सुनेत्रा पवार यांच्याकडेच पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली. २६ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादीच्या सर्वसाधारण सभेत प्रफुल पटेल यांच्याकडूनच ही घोषणा करण्यात आली होती. मात्र, आता या निवडीला आक्षेप घेत सुनेत्रा पवार यांना नोटीस बजावण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर २०२३ मध्ये अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले होते. मात्र, २८ जानेवारी रोजी विमान अपघातात अजित पवारांचे निधन झाले, त्यानंतर, राष्ट्रवादीचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षाच्या बैठकीत सुनेत्रा पवारच राष्ट्रीय अध्यक्ष असल्याची घोषणा केली. पटेल यांनी (पान ४ वर)

## ऑपरेशन टायगर थांबणार नाही; ठाकरे गटातील आणखी नेते येणार-उदय सामंत

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- ठाकरे गटातून शिवसेनेत येणाऱ्यांचा ओघ कायम राहणार असून ऑपरेशन टायगर हा शब्द वापरण्यापेक्षा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली प्रवेशाची प्रक्रिया सातत्याने सुरू राहील, असा दावा मंत्री उदय सामंत यांनी केला. त्याचवेळी दिल्लीतील जंतरमंतरवरील आंदोलनाला उद्धव ठाकरे यांनी १६ दिवसांनंतर पाठिंबा दिल्याबद्दलही त्यांनी टोला लगावला. लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी कपात, विनायक राऊत प्रकरण, कन्हैया कुमार, राम मंदिर



आणि नागपूर एटीएस कारवाईसह विविध मुद्द्यांवर सामंत यांनी पत्रकार परिषदेत भूमिका स्पष्ट केली.

ऑपरेशन टायगरबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना उदय सामंत म्हणाले की, ऑपरेशन टायगर म्हणण्यापेक्षा एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेशाची प्रक्रिया सातत्याने सुरू राहणार आहे. अनेक नगरसेवक, माजी नगरसेवक, माजी आमदार, माजी खासदार आणि महाविकास आघाडीतील काही आमदारही आमच्या संपर्कात आहेत. त्यामुळे ऑपरेशन वन, टू किंवा थ्रीवर आम्ही थांबणार नाही. पुढेही अनेक राजकीय घडामोडी घडतील, असा दावा त्यांनी केला.

दिल्लीतील जंतरमंतरवर सोनम वांगचूक आणि विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या पाठिंब्यावर सामंत यांनी उपरोधिक प्रतिक्रिया दिली. ''आज (पान ४ वर)

# सशस्त्र दलात महिला सक्षमीकरणाचा मानबिंदू

भारतीय सशस्त्र दलात महिलांचे वाढते योगदान हे देशाच्या बदलत्या सामाजिक आणि व्यावसायिक दृष्टिकोनाचे प्रतीक आहे. महिलांनी केवळ सैन्यात प्रवेश मिळवला नाही, तर आपल्या गुणवत्ता, नेतृत्व, शिस्त आणि कर्तृत्वाच्या बळावर सर्वोच्च जबाबदाऱ्याही यशस्वीपणे पेलण्याची क्षमता सिद्ध केली. अशाच प्रेरणादायी प्रवासाची साक्ष देणारी मेजर नव्या शेखावत यांची भारताच्या राष्ट्रपतींच्या सहाय्यक अधिकारी (एडीसी ) म्हणून झालेली नियुक्ती ही महिला सक्षमीकरणाच्या नव्या पर्वाचा अभिम ानास्पद टप्पा ठरली आहे.

जर नव्या शेखावत यांनी भारतीय लष्कराच्या इतिहासात नवा अध्याय लिहिला. त्या भारताच्या राष्ट्रपतींच्या सहाय्यक अधिकारी (एडीसी) म्हणून नियुक्त झालेल्या भारतीय सैन्याच्या पहिल्या महिला अधिकारी ठरल्या आहेत. राष्ट्रपती भवनातील ही प्रतिष्ठेची नियुक्ती भारतीय सशस्त्र दलासाठी एक ऐतिहासिक टप्पा असून, जबाबदारी, सन्मान आणि राष्ट्रीय प्रोटोकॉलच्या महत्त्वाच्या पदांवर महिलांची वाढती भूमिका अधोरेखित करणारे गौरवास्पद उदाहरण आहे. सैन्य सेवा दला(आर्मी सर्व्हिस कॉर्प)मधील अधिकारी असलेल्या मेजर नव्या शेखावत या सध्या भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या सहाय्यक अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. भारतीय सैन्यातील या पदावर नियुक्त होणाऱ्या त्या पहिल्या महिला अधिकारी असल्या तरी यापूर्वी मे २०२५ मध्ये भारतीय नौदलाच्या लेफ्टनंट कमांडर यशस्वी सोलंकी या राष्ट्रपतींच्या पहिल्या महिला अधिकारी बनल्या होत्या. मेजर शेखावत यांचे यश केवळ वैयक्तिक कामगिरी नसून भारतीय सशस्त्र दलांमध्ये महिलांच्या वाढत्या योगदानाचे आणि नेतृत्वक्षम तेचे प्रतीक आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे गुणवत्ता, व्यावसायिकता आणि नेतृत्व या गुणांच्या आधारे महिलांना सर्वोच्च जबाबदाऱ्या दिल्या जात असल्याचे स्पष्ट होते. मेजर शेखावत यांचा भारतीय सैन्यातील प्रवास संघ लोकसेवा आयोग (यूपीएससी) आयोजित संयुक्त संरक्षण सेवा (कम्बाइन्ड डिफफेन्स सर्व्हिसेस-सीडीएस) परीक्षेद्वारे सुरू झाला. त्यांनी ही अत्यंत स्पर्धात्मक अशी परीक्षा उत्तीर्ण करून अधिकारी प्रशिक्षण अकादमी (ऑफिसर्स ट्रेनिंग ॲकॅडमी), चेन्नई येथील शॉर्ट सर्व्हिस कमिशन महिला अ-तांत्रिक (वुमन नॉन टेक्निकल) अभ्यासक्रमासाठी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. अधिकारी प्रशिक्षण अकादमी चेन्नई ही भारतीय सैन्याची एक प्रतिष्ठित प्रशिक्षण संस्था आहे. येथे शारीरिक क्षमता, मानसिक खंबीरपणा, नेतृत्वगुण, शिस्त आणि अधिकारी म्हणून आवश्यक असलेले सर्व गुण विकसित केले जातात. मेजर शेखावत यांनी हे कठोर प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून भारतीय सैन्यात अधिकारी म्हणून नियुक्ती मिळवली.

त्यांना सेना सेवा दल (आर्मी सर्व्हिर्स कॉर्प)मध्ये नियुक्त करण्यात आले. भारतीय सैन्याच्या दृष्टीने ही अत्यंत महत्त्वाची शाखा असून, लष्करासाठी आवश्यक असलेला रसद पुरवठा, वाहतूक व्यवस्था, इंधन, अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक सामग्रीचे व्यवस्थापन ही तिची मुख्य जबाबदारी आहे. कोणत्याही लष्करी मोहिमेच्या यशामध्ये प्रभावी रसद व्यवस्था अत्यंत म हत्त्वाची असते आणि त्यामध्ये सैन्य सेवा दलाची भूमिका कणा म्हणून ओळखली जाते. सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड (सीडीएस) परीक्षेत यश मिळवणाऱ्या एका उमेदवारापासून ते भारतीय सैन्यात अधिकारी आणि त्यानंतर राष्ट्रपतींच्या सहाय्यक अधिकारीसारख्या प्रतिष्ठित पदापर्यंत पोहोचलेला त्यांचा प्रवास त्यांच्या समर्पण, कौशल्य आणि व्यावसायिक उत्कृष्टतेचे उदाहरण आहे. सेवेत तुलनेने कमी कालावधीत त्यांची या पदासाठी झालेली निवड ही त्यांच्या क्षमतेवर सैन्याने दाखवलेल्या विश्वासाची साक्ष आहे.

राष्ट्रपतीची सहाय्यक अधिकारी हे पद भारतीय सशस्त्र दलांतील अत्यंत प्रतिष्ठेचे आणि मानाचे मानले जाते. सहाय्यक अधिकारी हे राष्ट्रपतींच्या वैयक्तिक कर्मचारीवर्गाचा भाग असतात आणि अधिकृत कार्यक्रम, राष्ट्रीय समारंभ, पदक वितरण सोहळे, राजनैतिक कार्यक्रम तसेच विविध शासकीय समारंभांमध्ये राष्ट्रपतींना सहाय्य करतात. या पदासाठी शिस्त, आत्मविश्वास, प्रभावी व्यक्तिमत्त्व, उत्तम संवादकौशल्य आणि लष्करी प्रोटोकॉलचे सखोल ज्ञान आवश्यक असते. सहाय्यक अधिकारी हे केवळ आपल्या दलाचेच नव्हे, तर संपूर्ण भारतीय सशस्त्र दलाच्या सन्मानाचे आणि व्यावसायिकतेचे प्रतिनिधित्व करतात. दीर्घकाळ या पदांवर प्रामुख्याने पुरुष अधिकाऱ्यांची नियुक्ती होत होती. मात्र २०२५ मध्ये लेफ्टनंट कमांडर यशस्वी सोलंकी यांच्या नियुक्तीनंतर महिलांसाठी नवे दालन खुले झाले. त्यानंतर मेजर नव्या शेखावत या भारतीय सैन्याच्या पहिल्या महिला अधिकारी म्हणून या प्रतिष्ठित भूमिकेत विराजमान झाल्या आणि महिलांच्या प्रगतीचा हा प्रवास आणखी मजबूत झाला. राष्ट्रपती भवनातील अधिकृत कार्यक्रमांमध्ये राष्ट्रपतींसमवेत उभ्या असलेल्या मेजर शेखावत यांच्या छायाचित्रांनी आणि व्हिडीओंनी देशभरातील तरुणांमध्ये विशेष प्रेरणा निर्माण केली आहे. विशेषतः सैन्यात प्रवेश करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या अनेक तरुणींसाठी त्या 'नारी शक्ती'चे प्रेरणादायी प्रतीक ठरल्यात.

भारतीय सैन्यात महिलांचा प्रवास पाहिला तर १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला महिलांना शॉर्ट सर्व्हिस कमिशनद्वारे प्रवेश देण्यास सुरुवात झाली. त्यानंतर त्यांच्या जबाबदाऱ्या आणि संधी सातत्याने वाढत गेल्या. २०२० मध्ये सर्वोच्च न्यायालयाने महिला अधिकाऱ्यांना परमनंट कमिशन देण्याचा ऐतिहासिक निर्णय दिल्यानंतर महिलांसाठी नेतृत्व, कमांड आणि दीर्घकालीन सेवाकार्यासाठी नवे मार्ग खुले झाले. मेजर नव्या शेखावत यांची नियुक्ती हा या व्यापक बदलाचा महत्त्वाचा भाग आहे. त्यांचा प्रवास हेही सिद्ध करतो की केवळ लढाऊ शाखाच नव्हे, तर रसद आणि सहाय्यक शाखांतील अधिकारीही गुणवत्ता आणि उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर सर्वोच्च पदांपर्यंत पोहोचू शकतात.

सैन्यातील यश हे केवळ शैक्षणिक गुणवत्तेवर अवलंबून नसून शारीरिक तंदुरुस्ती, नेतृत्व, आत्मविश्वास, शिस्त आणि चारित्र्य या सर्व गुणांच्या एकत्रित विकासावर आधारित असते. त्यांची नियुक्ती भारतीय सैन्याच्या मूलभूत मूल्यांची कर्तव्य, सन्मान आणि सेवा पुन्हा एकदा प्रचिती देते. गुणवत्ता आणि पात्रतेच्या आधारावर महिलांना उच्च जबाबदाऱ्या देऊन भारतीय सैन्याने नेतृत्व हे लिंगावर नव्हे तर गुणवत्तेवर अवलंबून असते, हा भक्कम संदेश दिला. राष्ट्रपती भवनात आपल्या जबाबदाऱ्या पार पाडताना त्या असंख्य भारतीय युवक-युवतींसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत. त्यांचा प्रवास शिस्त, चिकाटी, व्यावसायिकता आणि निः स्वार्थ सेवाभाव यांचे उत्तम उदाहरण आहे. भारतीय सैन्याची वर्दी परिधान करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या प्रत्येक तरुणासाठी मेजर नव्या शेखावत यांची कथा एक महत्त्वाचा संदेश देते - सम र्पण, गुणवत्ता आणि सातत्यपूर्ण मेहनत यांच्या बळावर इतिहास घडवता येतो. जो महिलेच्या यशाचा नाही, तर तिच्या जिद्दीचा, कर्तृत्वाचा आणि नेतृत्वगुणांचा गौरव करणारा आहे.


# फडणवीस दिल्लीला खरचं जाणार का हो...!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे सुप्रीम बॉस आहेत. महायुती सरकारमधे ते सर्वोच्च आहेत आणि महाराष्ट्रात भाजपमधेही त्यांचा शब्द अंतिम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना जे महत्व आहे, तसेच फडणवीसांना महाराष्ट्रात आहे. फडणवीस यांची प्रशासावर पूर्ण पकड आहे. महायुतीच्या सर्व मंत्र्यांमधे त्यांचा दरारा आहे. मुख्यमंत्र्यांचा शब्द अंतिम असतो, असे त्यांनी स्वतःच्या बजावलेले आहे. पक्षात व सरकारमधे त्यांचा धाक आहे.

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विरोधी पक्षाने सरकारवर केलेल्या टीकेला उत्तर देताना त्यांनी जो आक्रमकपणा दाखवला त्याने विरोधी पक्ष गारद झालेला दिसला. २०१४ मधे भाजप - ( अविभाजित ) शिवसेना युती सरकारचे झालेले मुख्यमंत्री फडणवीस, २०१९ मधे पहाटेची शपथ घेऊन ७२ तासासाठी झालेले मुख्यमंत्री फडणवीस व २०२४ मधे महायुती सरकारचे झालेले मुख्यमंत्री फडणवीस यांत मोठा फरक आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी विरोधी पक्षनेता कसा आक्रमक असतो व सरकारला आपण कसा घाम फोडतो हे अनेकदा दाखवले. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना उपमुख्यमंत्री म्हणून काम करताना आपला पक्ष सर्वात मोठा असुनही कशा मर्यादा असतात याचा त्यांनी अनुभव घेतला आहे.

आता मात्र देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा एक मुत्सद्दी नेता, उत्तम प्रशासक, कुशल रणनितीकार म्हणून आहे. महाराष्ट्रात विरोधी पक्षाला त्यांनी जवळपास नामशेष करीत आणले आहे. उसने अवसान आणून विधिमंडळात भाषणे करणाऱ्या, सरकारवर आरोप करणाऱ्या व टीव्ही कॅमेरापुढे भूमिका मांडताना जनतेत संभ्रम निर्माण करणाऱ्या विरोधी पक्षनेत्यांवर फडणवीसांचे बारीक लक्ष असते. म्हणूनच देवेंद्र फडणवीस लवकरच केंद्रात जाणार अशा पुड्या महाआघाडीच्या नेत्यांकडून सोडल्या जात आहेत. विधिमंडळ अधिवेशनातील फडणवीस यांचा रूद्रावतार यावेळी प्रथमच बघायला मिळाला. अधिवेशन संपताना देवेंद्र फडणवीस दिल्लीला जाणार आणि चंद्रशेखर बावनकुळे मुख्यमंत्री होणार अशी कुजबूज सुरू झाली. खरचं, देवाभाऊ दिल्लीला जाणार का हो, असा प्रश्न सर्वत्र विचारला जाऊ लागला आहे.

उबाठा सेनेचे प्रवक्ते खासदार संजय राऊत रोज सकाळी पत्रकारांनी संवाद साधताना राजकारणातील घडामोडींवर नवनवीन कल्पना मांडतात. जिथे संधी मिळेल त्या मुद्दयावर भाजपावर तिखट आरोप करतात. मोदी, शहा आणि फडणवीस यांच्यावर केलेल्या टीकेला प्रसिध्दी चांगली मिळते याची त्यांना पूर्ण कल्पना असते. त्यांच्या पत्रकार परिषदेनंतर दिवसभर राऊत असे म्हणाले, तुम्हाला काय वाटते असा प्रश्नाचे वृत्तवाहिन्यांवरून गुऱ्हाळ चालवले जाते. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या फेरबदलाची चर्चा चालू असतानाच संजय राऊत यांनी, फडणवीस दिल्लीला जाणार व बावनकुळे मुख्यमंत्री होणार अशी पुडी सोडली व त्यावर राजकीय वतुर्ळात खमंग चर्चा सुरू झाली.



बावनकुळे सध्या फडणवीस यांचे निकटवर्तीय आहेत, फडणवीसांचा त्यांच्यावर विश्वास आहे, विदर्भातील ते एक सक्षम नेतृत्व आहे. सर्व घटकांशी समन्वय साधण्याची त्यांच्याकडे कला आहे. वृत्त वाहिन्यांवर सर्वाधिक बावनकुळे प्रतिक्रिया व्यक्त करताना दिसतात. ते कोणत्याही विषयावर कोणत्याही प्रश्नाला उत्तर देतात. फडणवीस दिल्लीला गेल्यावर बावनकुळे मुख्यमंत्री होऊ शकतात, या चर्चेला उधाण आल्यामळे एकनाथ शिंदे नाराज होऊ शकतात. पुन्हा एकदा मुख्यमंत्रीपदावर बसावे अशी शिंदे यांची जबर महत्वाकांक्षा आहे. पण भाजपा आपल्या पक्षाबाहेरील नेत्याला महाराष्ट्राचे सर्वोच्च पद देईल का, हा कळीचा मुद्दा आहे.

नुकत्यात संपलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान भवन परिसरात विविध वृत्तपत्रे, वृत्त संस्थांचे छायाचित्रकार, कॅमेरामन व पत्रकारांसोबत फोटो सेशन केले. मुख्यमंत्री म्हणून असे फोटो सेशन व पत्रकारांशी केलेला संवाद हा दुमिर्ळ प्रसंग होता.

खरचं , देवेंद्र फडणवीस दिल्लीत केंद्रात जाणार असतील तर महाराष्ट्रात मुख्यमंत्रीपदासाठी नवा चेहरा निवडणे हे भाजपापुढे आव्हान असेल.. राज्यातील जातीय व प्रादेशिक समतोल साधून हा निर्णय घ्यावा लागेल. महायुती सरकारमधे समन्वय साधणारा व २०२९ ची निवडणूक जिंकून देणाऱ्या नेतृत्वाकडे राज्याची धुरा सोपवावी लागेल. पण देवेंद्र फडणवीसांना तुल्यबळ असा पक्षात किंवा सरकारमधे दुसरा कोणी नेता आहे का ? या प्रश्नाचे उत्तर सहज देता येत नाही.

भाजपचे प्रवक्ते नवनाथ बन यांनी मात्र संजय राऊतांनी सोडलेल्या पुडीबद्दल त्यांना चांगलेच फटकारले आहे. ते म्हणतात- बावनकुळे मुख्यमंत्री होणार अशी भविष्यवाणी संजय राऊत करीत असते, तरी त्यांनी लक्षात घ्यावे की भाजपा हा एक कार्यकर्त्याचा पक्ष आहे. तुमच्या गटासारखे, उद्धव ठाकरे, मग आदित्य ठाकरे नंतर तेजस ठाकरे अशी घराणेशाही या पक्षात नाहीः २०२९ पर्यंत देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री असतील असे बन यांनी ठणकावून सांगितले आहे. बन पुढे म्हणतात- संजय राऊत यांना उबाठा सेनेच्या नगरसेवक पदासाठी उमेदवारी देण्याचाही अधिकार नाही, ते भाजपाचा मुख्यमंत्री ठरवून लागले आहेत. भाजपा काय करील याचे भाकीत वर्तवण्यापेक्षा उबाठा सेनेत काय होणार हे बघाः आदित्य ठाकरे तुम्हाला किंमत देत नाहीत, भास्कर जाधव तुम्हाला विचारत नाहीत. राहुल गांधींच्या सांगण्यावरून उबाठा गट चालतो, तसे भाजपा इतरांच्या सांगण्यावरून चालत नाहीः.

विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन चालू असताना शरद पवार यांची एकनाथ शिंदे यांच्या दालनात भेट झाली. पवार हे राज्याचे चार वेळा मुख्यमंत्री, माजी केंद्रीय कृषी व संरक्षणमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष. आज त्यांचा पक्ष काँग्रेसबरोबर इंडिया आघाडीत आहे.

महाराष्ट्रात महाआघाडीत आहे. पवारांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्र- कर्नाटक सीमा प्रश्नावर पुढे काय भूमिका घ्यावी हे ठरविण्यासाठी विधान भवनात बैठकीला बोलावले होते. पवार हे मुख्यमंत्र्यांकडे न जाता शिंदेंच्या कार्यालयात जाऊन बसले यावरून राजकारण वेगळे काही शिजत आहे म्हणून चर्चेला उधाण आले. एकनाथ शिंदे यांनी अधिवेशनाच्या तोंडावर ऑपरेशन टायगर करून उबाठा सेनेचे सहा खासदार शिवसेनेत आणले. त्यानंतर पवारांच्या पक्षावर ऑपरेशन टायगर धडकणार अशी कुजबूज सुरू झाली.

ज्येष्ठ नेते आपल्या कार्यालयात आले तर त्यांचे स्वागत करणे हा शिष्टाचार आहे, म्हणूनच आपण त्यांना शाल श्रीफळ देऊन त्यांचा सन्मान केला , असा खुलासा शिंदेंनी नंतर केला. पवार - शिंदे एकमेकांना भेटले म्हणजे राज्यात लगेच नेतृत्व बदल होणार, असे अंदाज बांधणे मूर्खपणाचे आहे. याच काळात माजी मंत्री जयंत पाटील व माजी मंत्री एकनाथ खडसे यांनी भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांची भेट घेतली, त्यावरून काहीतरी मोठे घडते आहे अशा बातम्या पेरल्या गेल्या. विरोधी पक्षातील नेत्यांनी सत्ताधारी पक्षातील नेत्यांना भेटूच नये, त्यांच्याशी बोलू नये, ही महाराष्ट्राची संस्कृती नाही. एकनाथ शिंदे यांनी उबाठा सेनेचे तेव्हा ४० आमदार व आता सहा खासदार फोडले म्हणून शिंदे यांना उबाठा सेनेने गद्दार ठरवले आहे. शरद पवारांनी कुणाला भेटावे व कुणाला भेटू नये हे उबाठा सेना ठरवणार का ?

गेल्या चार वर्षात ठाकरेंची शिवसेना फुटली, पवारांची राष्ट्रवादी फुटली, काँग्रेस पक्ष कमजोर झाला, भाजप नंबर १ पोचली, महायुती बळकट झाली. विधानसभेत महायुतीचे २३७ आमदार आहेत, तर विरोधी बाकांवर पन्नासही आमदार नाहीत.

विधिमंडळात विरोधी पक्षनेताही नाही, कारण विरोधी पक्षांकडे किमान आमदारांची संख्या नाही. हे सर्व देवेंद्र फडणवीस यांच्या कारकिर्दीत घडले आहे. देवेंद्र फडणवीस भाजपाचा राज्यातील भक्कम मोहरा आहे. देवेंद्र फडणवीस यांचे महाराष्ट्रातील हे शेवटचे अधिवेशन असेल असे भाकीत आदित्य ठाकरे यांनी वर्तवले आहे. त्यामुळेच देवाभाऊ खरचं दिल्लीला जाणार का, या चर्चेला उधाण आले आहे.

**- डॉ. सुकृत खांडेकर**

# निसर्गाचा ह्रास व जंगलतोडीमुळे देशात सुरूवातीच्याच पाऊसाने धारण केले रूद्ररूप!

**पुर्वी** देशात संततधारांचा पाऊस यायचा तेव्हा नदी नाले, तलाव तुडुंब भरायचे व नंतर पुरपरिस्थिति निर्माण व्हायची.परंतु सध्याच्या परिस्थितीत विकासाच्या नावाखाली खुलेआम निसर्गाची अवहेलना व कत्तल होत असुन मोठ्या प्रमाणात बिनधास्तपणे जंगलकटाई सुरू आहे.याचा दुष्परिणाम काय होईल याकडे सरकारचे अजिबात लक्ष नाही. त्यामुळे आज राज्यासह संपूर्ण देश पहिल्याच पावसाने जलमग्न झाल्याचे दिसून येते. यामुळे मोठ्या प्रमाणात जीवीत हाणी व वित्तीय हाणी सुध्दा झाली आहे आणि होत. याचे गंभीर परिणाम देशातील नागरिकांना आज भोगावे लागत आहे.देशातील वायनाड,मुंबई, पिंपरी चिंचवड,गुजरात सह देशातील अन्य ठिकाणासह आज अर्धा देश पाण्याखाली असल्याचे दिसून येते आणि यामुळे मोठ्या प्रमाणात वित्तीय व मानवीय हाणी मोठ्या झाली आहे आणि होत.दरड कोसळणे, कचऱ्याचे ढीगारे कोसळने,रस्त्यावरील खड्डे,पुल कोसळणे, विजेमुळे होणाऱ्या दुर्घटना, वाढते सिमेंट रोड,ड्रेनेज सिस्टीमचा अभाव इत्यादी अनेक कारणांमुळे पावसाचे पाणी रस्त्यावर, गावात, शहरात साचल्याचे दिसून येते आणि त्याचे रूपांतर छोट्या-मोठ्या दुर्घटनामध्ये होतांना आपण पहातो.सरकार मोठ्या प्रमाणात शहरीकरणावर व औद्योगिकरणावर भर देत आहेत. परंतु त्याच प्रम ाणात निसर्गाच्या संतुलनाकडे पुर्णपणे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येते.आज सरकारने जंगलकटाई करून अनेक भुभाग शहरीकरणाने व औद्योगिकीकरणाने व्यापलेला आहे व याचेच प्रायश्चित्त मानव,पशुपक्षी आणि अनेक जीवजंतूंना भोगावे लागते.जंगलातील पशुपक्षांचे रहाण्याचे ठिकाण जवळपास उध्दवस्त झाले असुन ते शहराकडे धाव घेतांना दिसतात. सरकार सांगते आम्ही मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करीत आहोत.परंतु हा सर्व प्रकार फक्त कागदावरच आहे ही बाब स्पष्ट होते आणि याचे जिवंत उदाहरण देशाच्या १४० कोटी जनते समोर आहे ,ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. महाराष्ट्रात आतापर्यंत अतिवृष्टीच्या अनेक कारणांमुळे ६३ लोकांचा बळी गेला आहे आणि देशाचा विचार केला तर शेकडोंच्या संख्येने जीवीत हाणी झाली असून पाळीव प्राण्यांना सुद्धा आपले प्राण गम वावे लागले ही अत्यंत गंभीर बाब आहे.अतीवृष्टीने देशाला व्यापले असुन संपूर्ण जनजीवन विस्कळित झाले आहे.आज जंगल तोडीमुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरत नाही त्यामुळे पावसाचे संपूर्ण पाणी उग्ररूप धारण करून नदी नाल्याना पुर येतो आणि हे संपूर्ण पाणी समुद्रात सामावते यामुळे दिवसेंदिवस समुद्राच्या पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात वाढत आहे.याम ुळे समुद्र किनारपट्टीच्या भागांना मोठा धोका निर्माण झाला आहे. निसर्गाचा समतोल दिवसेंदिवस ढासळत असल्याने जगातही गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे यात चीन, तैवान,जापान जलमग्न झाला असून या देशांना 'बावी' चक्रीवादळाचा मोठ्या प्रमाणात धोका वाढला असून त्याचे गंभीर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.त्याच प्रमाणात जगातील काही देश गर्मीची मार झेलत आहेत तर काही देश अतीवृष्टीची प्रहार सहन करीत आहेत आणि हा संपूर्ण प्रकार बदलत्या हवामानामुळे निर्माण झाला आहे.देशात एकीकडे पावसाचा तडाखा तर दुसरीकडे महाराष्ट्राच्या हिंगोलीतील वसमत आणि औंढा नागनाथ तालुक्याला दिनांक ९ जुलै २०२६ ला पहाटे भूकंपाचे लागोपाठ तब्बल १४ मोठे धक्के बसले यात नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर हादरले भूकंपाचा केंद्रबिंदू वसमत होता, सुमारे ४.६ रिक्टर स्केलचा धक्का बसल्याने पडझड झाली सुदैवाने जीवितहानी झाली नाही,यामुळे लातूरच्या भूकंपाच्या जून्या आठवणी ताज्या झाल्या.ही अत्यंत धक्कादायक बाब आहे.असे सांगितले जाते की, २०१७ पासून हिंगोली जिल्ह्यात म्हणजे गेल्या ९ वर्षात आतापर्यंत भूकंपाचे ३५ धक्के बसले आहेत हा सर्व प्रकार निसर्गाच्या होत असलेल्या ह्रासामुळे होत आहे.हिंगोली जिल्ह्यात आलेल्या भुकंपाने ३० सप्टेंबर १९९३ च्या किल्लारी येथील भूकंपाच्या आठवणी ताज्या झाल्या.यावरून स्पष्ट होते की, दिवसेंदिवस मानवाने निसर्गाची अवहेलना केल्यामुळे ही गंभीर परिस्थिती उद्भवली आहे.सरकारने वरील परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून वृक्षलागवडीकडे जास्तीत जास्त लक्ष केंद्रित केले पाहिजे व निसर्गाशी निगडीत होणारे धोके टाळले पाहिजे.जय हिंद!

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

# खडकांत लुप्त सुंदर मुर्ती व रंगविशेष!

**आम्ही खडकांशिवाय कुठे असू? खडकाळ प्रदेशात- रॉक हंटवर जा आणि काही आश्चर्यकारकपणे सुंदर आणि दुमिर्ळ असलेल्या खडकांसह तुम्हाला किती भिन्न प्रकार सापडतील ते पहाच. जगभरातील लोकांना खडकांबद्दल अधिक जाणून घेता यावे, यासाठी १३ जुलै हा दिवस आंतरराष्ट्रीय रॉक डे निश्चित करण्यात आला आहे. हे रॉक आणि रोल संगीताबद्दल नाही; हे सर्व दगडांच्या विविधतेबद्दल आहे! शेवटी, खडक पर्यावरणात मोठी भूमिका निभावतात आणि मानवाकडून अनेक वर्षांपासून त्यांचा वापर केला जात आहे. त्याविषयी थोडी थोडकी आस्था असणे अगत्याचे आहे. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा सदर ज्ञानवर्धक लेख जरूर वाचा... संपादक.**

खडक किंवा दगड हे एक किंवा अधिक खनिजे किंवा खनिज पदार्थांचे नैसर्गिकरित्या घडणारे घन पदार्थ आहेत. उदाहरणार्थ, सामान्य रॉक ग्रॅनाइट हे क्वार्ट्ज, फेल्डस्पार आणि बायोटाइट खनिजांचे मिश्रण आहे. पृथ्वीचा बाह्य घन थर, लिथोस्फियर, खडकापासून बनलेला आहे. संपूर्ण इतिहासात मानवजातीने खडकांचा वापर केला आहे. अश्मयुगापासून दगडांचा वापर अवजारांसाठी केला जात आहे. खडकांमध्ये आढळणारी खनिजे आणि धातू मानवी संस्कृतीसाठी आवश्यक आहेत. जगभरातील लोकांना खडकांबद्दल अधिक जाणून घेता यावे, यासाठी १३ जुलै हा दिवस आंतरराष्ट्रीय रॉक डे निश्चित करण्यात आला आहे. हे रॉक आणि रोल संगीताबद्दल नाही; हे सर्व दगडांच्या विविधतेबद्दल आहे! शेवटी, खडक पर्यावरणात मोठी भूमिका निभावतात आणि मानवाकडून अनेक वर्षांपासून त्यांचा वापर केला जात आहे. त्याविषयी थोडी थोड़ी आस्था असणे अगत्याचे आहे.

खडकांचे तीन प्रमुख गट परिभाषित केले आहेत- अग्निज खडक, गाळाचे खडक आणि रूपांतरित खडक. खडकांच्या वैज्ञानिक अभ्यासाला पेट्रोलॉजी म्हणतात, जो भूविज्ञानाचा एक आवश्यक घटक आहे. ग्रॅन्युलर स्तरावर, खडक खनिजांच्या कणांनी बनलेले असतात, जे यामधून रासायनिक संयुगापासून तयार झालेले एकसंघ घन पदार्थ असतात. जे व्यवस्थितपणे संरचित झालेले असतात. खडक तयार करणारी एकूण खनिजे रासायनिक बंधांनी एकत्र येतात. खडकामध्ये खनिजांचे प्रकार आणि विपुलता हे खडक ज्या पद्धतीने तयार झाले त्यावरून निश्चित केले जाते. अनेक खडकांमध्ये वाळू- सिलिका असते; सिलिकॉन आणि ऑक्सिजनचे एक संयुग जे पृथ्वीच्या कवचाच्या ७४.३ टक्के भाग बनवते. ही सामग्री खडकात इतर संयुगांसह क्रिस्टल्स बनवते. खडक आणि खनिजांम ध्ये सिलिकाचे प्रमाण हे त्यांचे नाव आणि गुणधर्म ठरवण्यासाठी एक प्रमुख घटक आहे.

आंतरराष्ट्रीय रॉक डेचा इतिहास असा आहे, आंतरराष्ट्रीय रॉक डे हा खडकाचे महत्व उजागर करण्याचा दिवस आहे, जो मानवजातीच्या अस्तित्वासाठी महत्त्वपूर्ण आहे. संपूर्ण इतिहासात खडकांचा वापर केला गेला आहे. अश्मयुगापासून खडक शस्त्रे आणि साधने म्हणून वापरण्यासाठी महत्त्वाचे आहेत. खडकांमध्ये सापडलेले धातू आणि खनिजे मानवी सभ्यतेसाठी महत्त्वपूर्ण- मौल्यवान आहेत. आधुनिक युगात खडक इमारतीच्या पायाभरणीत तसेच बारीक तुकडे करून गिट्टीच्या स्वरूपात रस्ते, पटांगण व स्लॅब सपाटीकरणात वापरले जातात. मूर्तिकार लोक खडकातून सुबक, सुंदर, चित्ताकर्षक मूर्ती घडवितात. रासायनिक रचना, पारगम्यता, घटक कणांचा पोत आणि कण आकार यासारख्या वैशिष्ट्यांनुसार खडकांचे भौगोलिकदृष्ट्या वर्गीकरण केले जाते. हे भौतिक गुणधर्म हे खडक तयार करणाऱ्या प्रक्रियेचे अंतिम परिणाम आहेत. कालांतराने खडकांचे एका प्रकारातून दुसऱ्या प्रकारात रूपांतर होऊ शकते, ज्याचे वर्णन रॉक सायकल नावाच्या भूवैज्ञानिक मॉडेलने केले आहे. या घटना खडकाचे तीन सामान्य वर्ग तयार करतात- अग्निज, गाळाचे आणि रूपांतरित खडके. खडकांचे हे तीन वर्ग अनेक गटांमध्ये विभागलेले आहेत. तथापि, संलग्न खडकांमध्ये कठोर आणि वेगवान सीमा नाहीत. त्यांच्या घटक खनिजांच्या प्रमाणात वाढ किंवा घट करून ते प्रत्येक श्रेणीत एकमेकांमध्ये जातात, एका प्रकारच्या खडकाची विशिष्ट रचना देखील हळूहळू दुसऱ्या खडकामध्ये विलीन होत असल्याचे आढळून येते. म्हणूनच रॉक नामांकन स्थापित करताना स्वीकारलेल्या व्याख्या केवळ सतत पदवीप्राप्त मालिकेतील कमी-अधिक अनियंत्रित निवडलेल्या बिंदूंशी संबंधित असतात.

आंतरराष्ट्रीय रॉक डे असा साजरा करायचा असतो, आपण आंतरराष्ट्रीय रॉक डे साजरा करू शकतो, अशा अनेक पद्धती आहेत. यापैकी एक पर्याय म्हणजे जगभरात उपलब्ध असलेल्या विविध प्रकारच्या खडकांवर तसेच या खडकांचे वेगवेगळे उपयोग यावर थोडे निरीक्षण व संशोधन करणे. आपण हे ज्ञान आपल्या मित्र आणि कुटुंबासह सामायिक करू शकतो. एकत्र खडकाळ भागात- रॉक हंटवर आपण जरूर गेले पाहिजे. आपण विविध प्रकारचे खडक गोळा करून त्यांच्याबद्दल जाणून घेऊ शकतो. आपल्या आवडत्या लोकांसोबत काहीतरी वेगळे करण्यात आपला वेळ घालवणे, खडकांचे नमुने जमविणे नेहमीच मजेदार असते.

आंतरराष्ट्रीय रॉक डे साजरा करण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे खडकांचा समावेश असलेल्या कला प्रकल्पाचा आनंद घेणे. पेंटिंगसाठी सर्वोत्तम खडक ते आहेत जे आपल्या हाताच्या तळव्यामध्ये बसू शकतात. प्रतिमा आणि डिझाइनसाठी सर्वोत्तम पृष्ठभाग हे खडक आहेत ज्यांची पृष्ठभाग सपाट आहे आणि छान आणि गुळगुळीत आहे. आपण पेंट करणे सुरू करण्यापूर्वी आपण खडकाची पृष्ठभाग देखील धुवावेत आणि सर्व घाण काढून टाकावी. तुम्हाला हे देखील दिसेल की ॲक्रेलिक पेंट सर्वोत्तम कार्य करते. आपण प्रयत्न करू इच्छित असलेल्या तंत्राच्या क्रमवारीनुसार आपण विविध प्रकारचे ब्रशेस वापरू शकतो. आपण पूर्ण केल्यावर, डिझाइन सील करू. आपण नवीन रंग आणि प्रभावांसह प्रयोग करू शकतो, खडकांच्या विविध थीम आणि रोमांचक डिझाइन तयार करू शकतो. खडक तयार करण्याचे नवनवीन तंत्र वापरून माणूस विटा, फरशा, लाद्या, टाईल्स, शौचालयाच्या शीट्स, आदी शोभिवंत वस्तूंची निर्मिती करू लागला आहे.

काही खनिजे आणि खडक इतके असामान्य दिसतात की त्यांच्याबद्दल आख्यायिका आणि दंतकथा उगवल्या आहेत. उदाहरणार्थ, असे मानले जात होते की सापाचे दगड हे गुंडाळलेल्या सापांचे अवशेष होते जे दगडांमध्ये बदलले होते. कलाकारांनी अनेक वर्षांपासून काही खनिजे आणि खडकांच्या आतील रंगांचा वापर केला आहे. उदाहरणार्थ- सिनाबार, जी खनिज खडकाची पावडर आहे, म ध्ययुगात त्याच्या चमकदार लाल रंगामुळे कलेसाठी वापरला जात असे. उल्का हे धातूचे किंवा खडकाचे तुकडे आहेत, जे पृथ्वीवर आदळतात. काहींनी लघुग्रह तयार करण्यासाठी तोडले आहे, जे मोठे खडक आहेत. जे गुरु आणि मंगळाच्या दरम्यान सूर्याभोवती फिरतात. जर एखादा मोठा उल्का पृथ्वीवर आदळला तर त्याचा परिणाम विवरात होऊ शकतो, अतोनात नुकसानही संभवते. ज्यामुळे तो जिथे उतरतो त्या परिसराचे दृश्यच बदलू शकतो.

आपण आंतरराष्ट्रीय रॉक डेवर खडकांबद्दल जाणून घेण्यासाठी काही वेळ घालवू शकतो. शेवटी त्यांच्या निर्मितीच्या वापराबद्दल आणि विविध उपयोजनांबद्दल बरीच माहिती काढू शकतो. आपल्याला आजच प्रारंभ करण्यास मदतीसाठी वरील काही आकर्षक तथ्यांसह सदर लेख पूर्ण करत आहे. सप्रेम नमस्कार!

!! आंतरराष्ट्रीय खडक दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

- संकलन व शब्दांकन -
श्री कृष्णकुमार आनंदी-
गोविंदा निकोडे गुरूजी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३

# पीएमश्री मौलाना आझाद विद्यालयात विद्यार्थ्यांना संविधान युवा मंचच्या वतीने शैक्षणिक साहित्य वाटप



वैजापूर, दि. १३ (प्रतिनिधी) - भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वरत्न, ज्ञानसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंती वर्ष निमित्ताने 'एक पेन -एक वही'अंतर्गत संकलित झालेले शैक्षणिक साहित्य सोमवार(ता.१३)रोजी येथील पीएमश्री मौलाना आझाद विद्यालयातील विद्यार्थ्यांना तालुक्याचे आ.प्रा. रमेश पा. बोरनारे, माजी नगराध्यक्षा शिल्पा परदेशी, शिक्षण सभापती बाबासाहेब पुतळे, राजेंद्र पा. साळुंके, नगरसेवक विशाल संचेती, पारस घाटे, प्रकाश चव्हाण, आमीर अली, जि.सदस्य श्रीराम गायकवाड, सेवा निवृत्त शिक्षणांधिकारी तथा सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत, गट विकास अधिकारी एच.आर. बोयनार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

प्रथम महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, छत्रपती शिवाजी म हाराज, अण्णा भाऊ साठे, यांच्या प्रतिमांना अभिवादन करून दीप प्रज्वलित करण्यात आले.प्रास्तविक श्रीकांत जाधव यांनी केले आमदार बोरनारे, शिल्पा परदेशी, व धोंडीराम राजपूत यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व जोतिबा फुले, शाहू महाराज यांच्या शैक्षणिक विचारांचे महत्व विशद करीत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी हे शैक्षणिक सहित्य उपयुक्त ठरेल असे प्रतिपादित केले. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक,व क्रीडाविषयक विकासासाठी वसंत क्लब मैदान उपलब्ध करून देण्यात येत आहे असे आ.बोरनारे यांनी आश्वासन दिले.या संविधान युवा मंचचे अध्यक्ष जीवन पठारे, कार्याध्यक्ष बाळासाहेब त्रिभुवन, उपाध्यक्ष श्रीकांत जाधव,सतिश त्रिभुवन, राहुल त्रिभुवन, सचिन त्रिभुवन, अंकुश त्रिभुवन,(हनुमंत गाव) यांनी सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला.

या प्रसंगी तहसीलदार सुनील सावंत, मंडळ अधिकारी गजानन जाधव यांनी ही भेट दिली. मुख्याध्यापक बी.बी.जाधव व शिक्षकवृंद यांनी सहकार्य केले.

या प्रसंगी माजी नगरसेवक रमेश हाडोळे, शैलेंश चव्हाण, ज्ञानेश्वर टेके, साहेबराव पडवळ, पत्रकार विलास म्हस्के, अण्णासाहेब ठेंगडे, जगन गायकवाड, प्रमोद पठारे, शिवा थोरात, नामदेव त्रिभुवन, अनिल आल्हाट, प्रल्हाद सातुरे, मोती वाघ यांच्यासह शालेय शिक्षक, उपस्थित होते. सुवर्णा बोर्डे यांनी संचलन केले.जीवन पठारे यांनी आभार मानले. संविधान युवा मंचच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# श्री क्षेत्र जैनगिरी (जटवाडा) येथे अमावस्येनिमित्त १४ जुलै रोजी पंचामृत अभिषेक व महाप्रसाद

छत्रपती संभाजीनगर, दि. १३ (प्रतिनिधी) - शहरापासुन १२ कि.मी.अंतरावरील असलेल्या हजारो जैन बांधवांचे श्रध्दास्थान श्री.१००८ संकटहर पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे दिनांक १४ जुलै २०२६ रोजी अमावस्यानिमित्त सकाळी १० वाजता मुलनायक श्री.संकटहर पार्श्वनाथ भगवंताचा पंचामृत अभिषेक णमोकार भक्ती मंडळचा सानिध्यात करण्यात येणार आहे. यावेळी सर्व उपस्थित समाज बांधवांना सकाळी ११ते २ या वेळेस महाप्रसाद देण्यात येणार आहे. अमावस्यानिमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक भगवंताचा पंचामृत अभिषेक नित्यनियम पुजा आरती करण्यात येणार आहे तरी समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहुन अभिषेक व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन जटवाडा क्षेत्राचे विश्वस्थ मंडळ यांनी केले आहे.

श्री.क्षेत्र जैनगिरी येथे महिन्याच्या प्रत्येक अमावस्येला भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात येत असतो तसेच यावेळी महाप्रसादाचेही आयोजन केले जाते

# शिवरक्षक स्वामिनिष्ठ नरवीर शिवाजी काशीद यांच्या ३६६ व्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



वैजापूर, दि. १३ (प्रतिनिधी) - प्रति शिवाजी महाराज म्हणून ओळखल्या जात असलेले शिवरक्षक, स्वामिनिष्ठ नरवीर शिवाजी काशीद यांच्या ३६६व्या पुण्यतिथी निमित्त येथील जिवाजी महाले पुतळा परिसरात सोमवार (ता.१३) रोजी सकाळी दहा वाजता त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून शिव-फुले-शाहू-आंबेडकर समितीच्या वतीने अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला.

प्रमुख अतिथी सामाजिक कार्यकर्ते ठा. धोंडीरामसिह राजपूत यांच्या हस्ते प्रथम पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.त्यांनी शहिद काशीद यांच्या कार्यकर्तृत्वावर उपस्थिताना माहिती दिली.

आयोजक समितीचे जगन गायकवाड, दिलीप अनर्थे, अण्णा साहेब ठेंगडे, बाबासाहेब गायकवाड, सेवानिवृत्त तलाठी अशोक पवार,सेवा निवृत्त अभियंता रणजित मथुरिया राजपूत, प्रमोद पठारे, श्री. विश्वासु, अमित अनर्थे, मोती वाघ, यांच्या सह समितीचे सदस्य उपस्थित होते.

# 'तुकाराम मुंढे धडाकेबाज कारवाईचा चेहरा'

प्रशासन म्हणजे फक्त फायली आणि सह्या नव्हेत, तर लोकांच्या विश्वासाचा पूल आहे. हा पूल जेव्हा ढासळायला लागतो तेव्हा त्याला पुन्हा उभं करायला काही मोजकेच अधिकारी पुढे येतात. तुकाराम मुंढे त्यातलेच एक नाव.मुंढे यांचं नाव घेतलं की डोळ्यासमोर उभी राहते ती एक प्रतिमा - सकाळी सात वाजता ऑफिस, खुर्चीवर न बसता मैदानात फिरणारा आयुक्त, आणि नियम मोडणाऱ्यांसमोर न झुकणारा प्रशासक. त्यांच्या कारकिर्दीत 'धडाका' हा शब्द उगाच जोडला गेला नाही. नाशिकपासून नवी मुंबईपर्यंत जिथे जिथे ते गेले, तिथे त्यांनी आधी व्यवस्था मोडली आणि मग ती नव्याने घडवली.त्यांची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांची निडरता. अनधिकृत बांधकाम असो, रस्त्यावरचं अतिक्रमण असो, की फायलींमध्ये अडकलेलं काम - मुंढे यांनी कधीही 'हे मोठं नाव आहे' म्हणून डोळे मिटले नाहीत. राजकीय दबाव, फोन, शिफारशी... सगळ्याला एकाच उत्तर - 'नियम तो नियम'. यामुळेच त्यांना काहींचा रागही आला आणि लाखो लोकांचं प्रेमही मिळालं.कोरोनाच्या काळात तर त्यांचा खरा कस लागला. नवी मुंबईत त्यांनी भीती पसरवली नाही, तर व्यवस्था उभी केली. दररोज आकडेवारी जाहीर करणे, चाचण्या वाढवणे, रुग्णांना वेळेत बेड मिळवून देणे - या सगळ्यात त्यांचा थेट सहभाग होता. त्या काळात लोकांना वाटलं की 'आपला आयुक्त आपल्यासोबत आहे'.

मुंढे यांच्यावर टीका होते ती एकाच कारणासाठी - ते खूप कडक आहेत. पण विचार करा, वर्षानुवर्षे साचलेली घाण एका दिवसात स्वच्छ करायची असेल तर झाडू हळुवार फिरवून चालत नाही. त्यांची ती कडकपणाच आज अनेक तरुण अधिकाऱ्यांसाठी प्रेरणा बनली आहे. शेवटी प्रशासनात दोनच मार्ग असतात - एक सोयीचा, ज्यात तडजोड असते. दुसरा अवघड, ज्यात प्रामाणिकपणा असतो. तुकाराम मुंढे यांनी दुसरा मार्ग निवडला. म्हणूनच ते फक्त एक अधिकारी न राहता, 'सिस्टम बदलू शकते' यावर विश्वास ठेवणाऱ्या लोकांसाठी एक उदाहरण बनले.

**- सुदाम भाऊसाहेब शिंदे**

# स्वराज सुमित लिंभारेचा अबॅकस स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर तिसरा क्रमांक



छत्रपती संभाजीनगर, दि. १३ (प्रतिनिधी) - येथे दि. दि. २८ जून २०२६ रोजी संपन्न झालेल्या राष्ट्रीय अबॅकस ऑलिम्पियाड २०२६ या स्पर्धत संभाजीनगर येथील तेजस्व सुपर अबॅकस अकॅडमीने राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी ठसा करत आपला उमटवला. या स्पर्धत अकॅडमीच्या संचालिका रुपाली पठाडे यांच्या मार्गदर्शना खाली विद्यार्थी स्वराज सुमित लिंभारे याने स्पर्धच्या लेव्हल १ बी गटात उत्कृष्ट कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावर तिसरा क्रमांक पटकवला त्याच्या या यशामुळे तेजस्व सुपर अबँकस अकॅडमीच्या शिरपेचातब आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला. उत्कृष्ट वेग व अचुकता दाखवत ६ मिनिटामध्ये १०० गणिते सोडवत हजारो विद्यार्थी मध्ये आपली गुणवत्ता सिद्ध केली.

कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून एम जी एम विदयालयाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळसर, प्रसिद्ध दंतचिकित्सक मेघना कीर्ती, आयटी उद्योजक जैन सर तसेच सुपर अबँकसचे व्यवस्थापकीय संचालक मनिष महाजन उपस्थित होते. या उल्लेखनीय यशाबद्दल तेजस्व सुपर अबँकस अकॅडमीच्या संचालिका रुपाली पठाडे व विजेता विद्यार्थी स्वराज सुमित लिंभारे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून विद्यार्थाच्या गुणवत्तापूर्ण प्रशिक्षणाचा हा गौरव मानला जात आहे.

# मुख्याध्यापिका नीता लिलाताई गोकुळ पाटील यांच्या ३९वर्ष सेवेचा- सेवापूर्ती सोहळा उत्साहात



वैजापूर, दि. १३ (प्रतिनिधी) - येथील पालिकेच्या पीएमश्री मौलाना आझाद विद्यालयातील विद्यार्थी प्रिय मुख्याध्यापिका नीता लीलाताई गोकुळ पाटील यांच्या ३९वर्ष सेवेचा सेवा पूर्ती सोहळा रविवार(ता,१२) रोजी लक्ष्मी-नारायण लॉन येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. माजी नगराध्यक्षा शिल्पा परदेशी या अध्यक्षस्थानी होत्या.

तर नगरसेवक साबेरखान, विशाल संचेती, प्रकाश चव्हाण, शिक्षण सभापती बाबासाहेब पुतळे, नगरसेवक हमीद कुरेशी, आमिरअली, पारस घाटे, नगरसेविका ज्योती जोशी, संगीता राजपूत, सुमैय्या बक्ष, माजी नगराध्यक्ष राजूसिंग राजपूत यांच्यासह माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत, सेवा निवृत्त विस्तार अधिकारी बाळासाहेब म्हस्के, अंजली जोशी, श्री. शेवतेकर, जी.जी. राजपूत, यांच्या सह शहर व तालुक्यातील शिक्षक संघटना पदाधिकारी, शिक्षक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. नीता पाटील यांनी केलेले शैक्षणिक कार्य अत्यंत गुणात्मक व उच्च दर्जाचे होते त्यांनी शिक्षण क्षेत्राला पूर्णपणे वाहून घेतले होते, असे उदगार उपस्थितांनी व्यक्त केले.त्यांचे पती सेवानिवृत्त केंद्र प्रमुख राजेंद्र पाटील, मुख्याध्यापक बी.बी. जाधव, सुभाष गोमलाडू, संदीप शेळके, श्री. तगरे, श्री, बोढरे यांनी तसेच ज्योती दिवेकर, लता सुखासे, वैशाली पगारे, श्रीमती भाकरे, सुनीता वसावे यांनी सहभाग नोंदविला. श्री.पवार, श्री. जगदाळे, श्री. नारायण, यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील कार्यरत व सेवा निवृत्त शिक्षक जेष्ठ नागरिक साहेबराव साळुंके, कृष्णा कांबळे, पी.वाय चव्हाण, यांची उपस्थिती होती. शेवटी राजेंद्र पाटील व नीता पाटील यांनी सर्वांना धन्यवाद दिले.

समाजातील गरजू, वंचित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मदतीचा हात देणे हीच खरी सम ाजसेवा असून, प्रत्येकाने सामाजिक बांधिलकी जपत गरजूंसाठी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन युथिका सेल्फ सस्टेन्ड संस्थेच्या सय्योमिता नहार यांनी केले. त्या संस्थेतर्फे आयोजित सामाजिक उपक्रमादरम्यान बोलत होत्या. यावेळी विविध समाजोपयोगी उपक्रमांद्वारे गरजू नागरिकांना मदत करण्यात आली. संस्थेच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण तसेच गरजू कुटुंबांना आवश्यक वस्तूंचे वाटप अशा विविध उपक्रमांची सातत्याने अंमलबजावणी केली जात असल्याची माहिती त्यांनी दिली. संयमिता नहार म्हणाल्या, 'समाजातील प्रत्येक सक्षम व्यक्तीने आपल्या क्षमतेनुसार गरजूंना मदतीचा हात दिल्यास अनेकांचे जीवनमान उंचावू शकते.

# पायाभूत प्रकल्पांची निधीटंचाई दूर करण्यासाठी 'अर्बन चॅलेंज फंड'

## - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची संकल्पना; ९० हजार कोटींचा प्रकल्प निधी प्रस्तावित

मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) - शहरांच्या प्रगतीतील आर्थिक व प्रशासकीय अडथळे दूर करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'अर्बन चॅलेंज फंड' तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानाधारित शहरी योजनांसोबतच, शहरांच्या संस्थात्मक आणि आर्थिक मर्यादांमुळे रखडणाऱ्या पायाभूत प्रकल्पांना गती देण्यासाठी हा फंड महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोमवारी व्यक्त केला. या अभियानांतर्गत कर्ज रोखे आणि खासगी-सार्वजनिक भागीदारीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर निधी उभारणी केली जाणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली 'वर्षा' निवासस्थानी नगर विकास विभागाची उच्चस्तरीय आढावा बैठक पार पडली. या बैठकीत 'अर्बन चॅलेंज फंड' अभियानाच्या सर्वसमावेशक आराखड्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीला नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, वित्त व नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, यापूर्वी नाशिक आणि पुणे महानगरपालिकेने याच धर्तीवर यशस्वीपणे बाजारपेठेतून निधी उभारणी करून पाणीपुरवठा व स्वच्छतेचे मोठे प्रकल्प मार्गी लावले आहेत. या महानगरपालिकांच्या निधी उभारणीच्या प्रस्तावांना राष्ट्रीय सर्वोच्च समितीची (एनएसी) मंजुरी देखील मिळाली आहे. याच धर्तीवर आता आगामी काळात पिंपरी-चिंचवड आणि नागपूर महानगरपालिकेतील काही महत्त्वाच्या प्रकल्पांनाही या पद्धतीने निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

९० हजार कोटींचा वित्तीय आकृतीबंध - बैठकीत अर्बन चॅलेंज फंडासाठीच्या वित्तीय आकृतीबंधाबाबत सविस्तर सादरीकरण व चर्चा करण्यात आली. या एकूण अभियानात तब्बल हजार ९० हजार कोटींचा प्रकल्प निधी प्रस्तावित करण्यात आला आहे. यामध्ये महाराष्ट्रासाठी केंद्र शासनाचा वाटा ११ हजार २०० कोटी, राज्य शासनाचा वाटा ११ हजार २०० कोटी आणि बाजाराधारित स्रोतांतून (कर्ज रोखे व इतर) २२ हजार ४०० कोटी मिळून पहिल्या टप्प्यात एकूण ४४ हजार ८०० कोटींच्या महाप्रकल्पांना चालना दिली जाऊ शकते, अशी माहिती बैठकीत देण्यात आली.

**नेमके काय काम करणार?**

या महत्त्वाकांक्षी अभियानांतर्गत शहरांचा कायापालट करण्यासाठी २२ प्रमुख घटकांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने डिजिटल प्रशासन, मुख्य नागरी पायाभूत सुविधांचा विकास, चक्रीय अर्थव्यवस्था, शहरातील वाहतूक कोंडी कमी करणारे प्रकल्प आणि शेवटच्या टप्प्यातील जोडणी (लास्ट माईल कनेक्टिव्हिटी) यावर भर दिला जाईल. याशिवाय, ५ ते २० चौ.कि.मी. क्षेत्रातील शहर भागांचे पुनरुज्जीवन करणे, लहान व मध्यम शहरांना विकासाची नवी केंद्रे बनवणे, जुन्या परपेठांचे पुनर्विकास, पायी चालणारे व सायकलस्नेही वाहतूक प्रकल्प, निदर्शक प्रकल्प, ट्रान्झिट हब उन्नतीकरण, ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट अंतर्गत पायाभूत सुविधांचा विकास, शहर-विकास केंद्रे, शहरांचे सृजनशील पुनर्विकास तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता प्रकल्पांचा यामध्ये प्रामुख्याने समावेश असेल.

# जिल्हा अल्पसंख्याक कल्याण समिती सदस्य पदासाठी अर्ज मागविले

छत्रपती संभाजीनगर, दि. १३ (प्रतिनिधी) - अल्पसंख्याक समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उन्नतीसाठी आणि त्यांच्या समस्या तातडीने सोडविण्यासाठी जिल्ह्यास्तरावर अल्पसंख्याक कल्याण समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे. या समितीवर काम करण्यासाठी जिल्हयातील अल्पसंख्याकांसाठी कार्यरत असलेल्या अशासकीय स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधीं यांनी २७ जुलै २०२६ पर्यंत अर्ज दाखल करावेत. इच्छुक स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींनी विहित नमुन्यात आपला प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. प्रस्तावात संस्थेचे नाव, पत्ता, नोंदणी क्रमांक, अल्पसंख्याक दर्जाचे प्रमाणपत्र आणि संबंधित प्रतिनिधीने अल्पसंख्याक समाजासाठी केलेल्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कार्याचा सविस्तर तपशील असणे अनिवार्य आहे. पूर्ण भरलेले प्रस्ताव २७ जुलै, २०२६ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे सादर करावेत. अधिक माहितीसाठी जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी तथा जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालय येथे संपर्क करावा असे आवाहन प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# युथिका आयोजित छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा महोत्सव २०२६ आयोजन



छत्रपती संभाजीनगर, दि. १३ (प्रतिनिधी) - युथिका ही २०० हून अधिक सदस्यांची युवा-नेतृत्वाखाली कार्यरत असलेली स्वयंसेवी संस्था असून, गेल्या पाच वर्षांपासून एड्सग्रस्त बालकांची काळजी, महिला सक्षमीकरण प्रकल्प, मासिक पाळी स्वच्छता जनजागृती व साहित्य वितरण तसेच दर सोमवारी गोशाळांना भेट देऊन ५५० हून अधिक गायींसाठी चाऱ्याची व्यवस्था अशा विविध सामाजिक उपक्रमांद्वारे समाजसेवा करत आहे. संस्थेच्या संस्थापक सय्योमिता नहार यांच्या नेतृत्वाखाली युथिकाने समाजसेवेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत समाजात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

स्वयंभू संस्था म्हणून युथिका आपल्या सामाजिक उपक्रमांसाठी आवश्यक निधी स्वतः उभारते. त्यासाठी संस्था मॉडेल युनायटेड नेशन्स (MUN) तसेच छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा महोत्सव २०२६ यांसारख्या निधी संकलन उपक्रमांचे आयोजन करते. यंदाच्या क्रीडा हा १८ व १९ जुलै रोजी ईनफ्युटौ टर्फ बीड बायपास म होत्सवामध्ये क्रिकेट, फुटबॉल आणि पिकलबॉल या स्पर्धांचा समावेश आहे.

यंदाच्या महोत्सवाचे टायटल स्पॉन्सर रेडफिट जिम असून त्याच्या संचालिका सौ. पौर्णिमा राजपूत यांच्या सहकार्यामुळे युवकांचा विकास, तंदुरुस्ती आणि सामाजिक बांधिलकीला मोठे बळ मिळत आहे. तसेच को-टायटल स्पॉन्सर जबिंदा बिल्टस्पेसचे संचालक श्री. गुणवंत सिंह जबिंदा यांनीही या उपक्रमाला मोलाचे सहकार्य देत सामाजिक कार्याला प्रोत्साहन दिले आहे. यंदाच्या महोत्सवाचे शिक्षण प्रायोजक स्टेपिंग स्टोन्स हायस्कूल असून, श्री. झईम रहीम यांनी या उपक्रमाच्या आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले आहे.

क्रिकेट स्पर्धेत श्री. उदय फेपाळे (MOP Dominators), श्री. प्रज्वल भगत (Lumen), सौ. पौर्णिमा राजपूत (Redfit), श्री. सलमान सुरी (SK Infra), श्री. अबुबकर पटेल (Patel Strikers), श्री. अंशुमन देसाई, श्री. आयुष इसरानी, श्री. विक्रांत राजपूत (Terra), श्री. तरंग तोतला (Sledgers United) आणि श्री. सुमित सोनी (Ather) यांच्या मालकीचे संघ सहभागी होणार आहेत.

या निधी संकलन उपक्रमाद्वारे युथिका क्रीडेच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणत सामाजिक उपक्रमांना अधिक बळकटी देण्याचा प्रयत्न करत आहे.

# नमित मल्होत्रा यांच्या भव्य 'रामायण'चा ट्रेलर २४ जुलै रोजी जगभर प्रदर्शित होणार; निर्मात्यांची घोषणा

**नमित** मल्होत्रा यांचा 'रामायण' हा भारतीय सिनेसृष्टीतील सर्वात भव्य चित्रपटांपैकी एक मानला जात असून, भारताची समृद्ध सांस्कृतिक परंपरा जागतिक स्तरावर पोहोचवण्याचा त्याचा प्रयत्न आहे. 'राम'ची पहिली झलक प्रदर्शित होताच प्रेक्षकांकडून तिला प्रचंड प्रतिसाद मिळाला आणि सोशल मीडियावरही मोठी चर्चा रंगली. हा केवळ एक चित्रपट नसून भारतीय संस्कृतीचा आणि वारशाचा जागतिक उत्सव ठरणार आहे. आता निर्माते २४ जुलै २०२६ रोजी या चित्रपटाचा ट्रेलर जगभर प्रदर्शित करण्यासाठी सज्ज झाले आहेत.

होय, अखेर 'रामायण' च्या ट्रेलरच्या प्रदर्शनाची अधिकृत तारीख जाहीर करण्यात आली आहे. जगभरातील प्रेक्षकांना या भव्य विश्वाची आणखी सखोल झलक देणारा ट्रेलर २४ जुलै रोजी प्रदर्शित होणार आहे. दोन भागांमध्ये सादर होणारा हा चित्रपट 'राम ायणम : पार्ट वन' भारतातील सर्वात पूजनीय महाकाव्यांपैकी एका कथेला अभूतपूर्व भव्यता, भावनिक ताकद आणि अत्याधुनिक व्हिज्युअल स्टोरीटेलिंगच्या माध्यमातून मोठ्या पडद्यावर साकारतो. ट्रेलरच्या प्रदर्शनाची घोषणा झाल्यानंतर चाहत्यांमधील उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

निर्मात्यांनी सोशल मीडियावर ट्रेलरच्या प्रदर्शनाची घोषणा करत कॅप्शनमध्ये म्हटले आहे

**'भारताकडून जगासाठी... 'राम ायण'चा ट्रेलर २४ जुलै २०२६ रोजी जगभर प्रीमियर होणार.'**

आतापर्यंतच्या सर्वाधिक लोकप्रिय आणि अजरामर महाकाव्यांपैकी एक असलेल्या राम ायणावर आधारित नितेश तिवारी दिग्दर्शित 'रामायण' हे महाकाव्यातील भावविश्व आणि भव्यता आधुनिक सिनेमॅटिक स्वरूपात सादर करणार आहे. या चित्रपटात रणबीर कपूर भगवान श्रीराम यांच्या भूमिकेत, साई पल्लवी सीतेच्या भूमिकेत, तर रॉकिंग स्टार यश रावणाच्या भूमिकेत दिसणार आहेत. सनी देओल हनुमानाची भूमिका साकारत असून, रवि दुबे लक्ष्मणाच्या भूमिकेत झळकणार आहेत.

नितेश तिवारी दिग्दर्शित आणि आठ वेळा ऑस्कर विजेत्या तज्ञ्द स्टुडिओ DNEG तसेच यश यांच्या Monster Mind Creations यांच्या सहकार्याने नमित मल्होत्रा यांच्या झीळाश ऋेर्ंी डींवळी निर्मित हा दोन भागांचा भव्य चित्रपट जगभर खचअद स्वरूपात प्रदर्शित होणार आहे. 'राम ायणम: पार्ट १' दिवाळी २०२६ मध्ये, तर 'रामायणम: पार्ट २' दिवाळी २०२७ मध्ये प्रदर्शित होईल.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
**: संपादक :**
**राजेंद्र पांडुरंग रांजणीकर**
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# पाणी योजनेची कोंडी फोडण्यासाठी बैठक घेण्याचे महापौरांचे मुख्यमंत्र्यांना साकडे



छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- शहराच्या नव्या पाणी पुरवठा योजनेतील विविध यंत्रणांमध्ये असमन्वयामुळे सुरू असणारी अनागोंदी थांबावी म्हणून कंत्राटदार आणि उच्चपदस्थ अधिकाऱ्यांबरोबर बैठक घ्यावी अशी मागणी महापौर समीर राजूरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. 'महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील वरिष्ठ अधिकारी , कंत्राटदार, विभागीय आयुक्त आणि महापालिका आयुक्तासह बैठक घेणे गरज असल्याचे', महापौरांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे.

पाणीपुरवठा योजनेतील प्रगतीकडे दुर्लक्ष केल्याचा ठपका ठेवून उपअभियंता पूजा जाधव यांना निलंबित करण्यात आल्यानंतर २७५० कोटी रुपयांच्या योजनेतील निष्कृष्ट कामांची यादीच पुढे आली आहे. यामध्ये जायकवाडी ते नक्षत्रवाडी या दरम्यान होणाऱ्या पाणी उपशासाठी सुरू असणाऱ्या पंपगृहाच्या गळतीकडे लक्ष वेधण्यात आले आहे. पंपगृहात पहिल्याच पावसात गळती सुरू झाली. परिणामी विद्युत उपकरणे पाण्यात भिजली. सुरक्षिततेच्या कारणामुळे ती उपकरणे बंद करावी लागली.

महापालिकेचे आयुक्त अमोल येडगे यांनी बैठक घेऊन कंत्राटदारास तंबी दिल्यानंतर पंप हाऊस सुरू करण्याची कारवाई करण्यात आली. त्यामुळे शहराच्या पाणी पुरवठ्यात ३० ते ३५ दशलक्ष लिटर पाण्याची भर पडली. मात्र, जीवन प्राधिकरणातील अधिकारी आणि कंत्राटदार यांच्यामध्ये अजूनही समन्वयाचा अभाव दिसून येत आहे.

केवळ एवढेच नाही, तर उद्धव विहिरीतील गाळ काढण्यास कंत्राटदाराने पाच महिने उशीर केला. जॅकवेलपर्यंत जाण्याचा पूल तर अजूनही नादुरुस्त आहे. अनेक व्हॉल्व्हमध्ये गळती कायम आहे. त्याच्या चेंबरची कामे पूर्ण झाली नाहीत. फिल्टर हाऊससारख्या अत्यंत संवेदनशील घटकावर निवाराही उभारण्यात आला नाही.

शहरात १२०० किलोमीटरच्या वितरण वाहिन्या टाकल्या असल्या, तरी त्यांची जलदाब चाचणी पूर्ण झालेली नाही. तसेच शुद्ध पाण्याच्या गुरुत्वीय वाहिनीचीही जलदाब चाचणी पूर्ण झालेली नाही, अशी तक्रार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केली होती. खूप प्रयत्न करुनही कंत्राटदारास पाठिशी घातले जात असून अधिकाऱ्यांवर कारवाई केली जात असल्याचे मत लेखी स्वरुपात अभियंत्यांनी दिले होते. या प्रश्नात वरिष्ठ पातळीवरुन सूचना देण्याची गरज असल्याने बैठक घेण्याचा महापौरांचा आग्रह असल्याचे सांगण्यात येते.

शहरातील ५५ जलकुंभांपैकी जुन्या योजनेतून केवळ सहा जल कुंभांतूनच पाणीपुरवठा सुरू आहे. नव्या योजनेचा लाभ नागरिकांना मिळू शकला नाही. दिल्ली गेट आणि जुबली पार्क भागातील जलकुंभाची गळती रोखण्यास कंत्राटदारास पूर्ण वर्ष लागले. हे काम आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंत्राटदाराकडून अपेक्षित नाही, असेही अभियंत्यांनी पत्रात म्हटले आहे. शहरातील २५ जल कुंभांना जोडण्यासाठी आवश्यक १० ते १२ मीटरचे काम कंत्राटदाराने पूर्ण न केल्याने पाणीपुरवठा सुरू करता आला नाही. कंत्राटदाराने काम वेळेत केले नाही; तरी त्याला कोणी विचारत नाही आणि अधिकाऱ्यांचे निलंबन केले जात असल्याने या सर्व कामातून आमची मुक्तता करावी, अशी मागणी अधिकाऱ्यांनी केली आहे. कंत्राटदारावर मेहरबानी आणि अधिकाऱ्यांना शिक्षा असे चित्र निर्माण झाले होते. महापालिका आयुक्त आणि विभागीय आयुक्त या प्रकरणात बैठका घेत असले तरी प्रकल्पाच्या शेवटच्या टप्प्यात अधिक लक्ष घालावे, अशी विनंती मुख्यमंत्र्यांना करण्यात आली आहे.

# जिल्ह्यात वृक्ष लागवड उद्दिष्टपूर्तीचे नियोजन करा-जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी

## महाराजस्व अभियानातील उपक्रमाची सुरुवात वृक्ष लागवडीने करावी




छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- हरित महाराष्ट्र मोहीम अंतर्गत सर्व शासकीय विभागांना नेमून दिलेल्या वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी नियोजन करावे . महाराजस्व अभियान उपक्रमाची सुरुवात वृक्ष लागवडीने करून सर्व यंत्रणांनी लोकसहभागातून वृक्षलागवड ,जतन आणि संवर्धन करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात वृक्ष लागवडबाबत बैठकीत जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी वृक्षलागवडी बाबत नेमून दिलेल्या उद्दिष्टांचा आढावा घेतला.

बैठकीस माजी आमदार संजय केणेकर , जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीन्नू पी. एम, प्रादेशिक वन अधिकारी सुवर्णा माने, सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी संदीप गिरी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी,व सर्व विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते. जिल्हाधिकारी गौडा म्हणाले की , जिल्ह्यात महसूल विभागाच्या वतीने दिनांक २२ जुलै२०२६ रोजी महाराजस्व अभियानाची सुरुवात होणार असून या अभियाना अंतर्गत नागरिकांना विविध सेवा सुविधांचा लाभ देण्यात येणार आहे. या उपक्रमाची सुरुवात वृक्ष लागवडीने करावी .तसेच जिल्हास्तरीय महाराजस्व अभियानाच्या कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत वृक्ष लागवड प्रत्येक मतदारसंघ निहाय लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीमध्ये तसेच प्रत्येक शासकीय विभाग प्रमुख यांच्या उपस्थित हा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा.

सामाजिक वनीकरण विभागाने प्रत्येक शासकीय विभागाला नेमून दिलेल्या वृक्ष लागवडीचे उद्दिष्टाच्या तुलनेत रोपवाटिकांचे संपर्क क्रमांक, नाव , ठिकाण आणि रोपांची उपलब्धता याबाबत नियोजन माहिती करून माहिती उपलब्ध करून द्यावी. जेणेकरून त्या- त्या विभागाला नजीकच्या रोपवाटिकेतून रोपांची उपलब्धता होण्यास मदत होईल. हरित महाराष्ट्र मिशन' ही नागरिकांच्या पुढाकारातून लोक चळवळ व्हावी तसेच यामध्ये विविध सामाजिक संस्थांचा सहभाग घेऊन वृक्षारोपण करण्याचे आवाहन माजी आमदार संजय केनेकर यांनी उपस्थित यंत्रणेला केले.

# कचरा टाकण्यावरून वाद; महापालिकेच्या नागरिक मित्र पथकाला धक्काबुक्की व शिवीगाळ, गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- शहरातील सिडको भागातील एम २ रोडवरील जिजाऊ चौक परिसरात कचरा टाकल्याप्रकरणी दंड भरण्यास सांगणाऱ्या महानगरपालिकेच्या नागरिक मित्र पथकातील सदस्यासोबत वाद घालून त्यांना धक्काबुक्की व शिवीगाळ केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी महापालिकेत नागरिक मित्र पथकात कार्यरत असलेले संतोष बनकर यांनी पोलिसात तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीवरून संशयित आरोपी राम वाकळे आणि हर्षल गावंडे उर्फ मुन्ना यांच्याविरुद्ध सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, १३ जुलै २०२६ रोजी सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास जिजाऊ चौकातील प्रभा डेअरी जवळ मोठ्या प्रमाणावर कचरा टाकण्यात आल्याची माहिती नागरिक मित्र पथकातील बनकर आणि त्यांचे सहकारी किसन निकम यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी घटनास्थळी जाऊन चौकशी केली असता, 'साई अर्क डमी'चे राम वाकळे यांनी हा कचरा टाकल्याचे समोर आले. नागरिक मित्र पथकाने त्यांना महापालिकेच्या नियमांनुसार दंड भरावा लागेल असे समजावून सांगितले. याचा राग आल्याने वाकळे यांनी प्रकाश आथरदे यांचे सहयोगी हर्षल गावंडे उर्फ मुन्ना याला तेथे बोलावून घेतले.

घटनास्थळी पोहोचताच हर्षल गावंडे याने महापालिका कर्मचाऱ्यांशी जोरदार वाद घातला. हा वाद एवढ्यावरच थांबला नाही, तर हर्षलने बनकर यांच्या सहकाऱ्याचा मोबाईल हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला आणि बनकर यांची कॉलर पकडून त्यांना धक्काबुक्की व शिवीगाळ केली. सार्वजनिक शांततेचा भंग करत शासकीय कर्मचाऱ्यांना कर्तव्यापासून रोखल्याप्रकरणी अखेर पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध कायदेशीर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# शहरी आरोग्य सेवेच्या विविध उपक्रमांचा आयुक्तांकडून आढावा

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- आयुक्त, शहरी आरोग्य सेवा, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार आरोग्य सेवा परिमंडळ छत्रपती संभाजीनगर व लातूर यांच्या अधिपत्याखाली राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियाअंतर्गत महानगरपालिका, नगरपालिका स्तरावर आरोग्य संस्था व राज्य योजनेअंतर्गत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना याद्वारे राबविण्यात येत असलेल्या विविध आरोग्य विषयक उपक्रमांचा आढावा सोमवार, दि. १३ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता आयएमए हॉल, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर येथे घेण्यात आला.

या आढावा बैठकीस डॉ. सुनील भोकरे, आयुक्त, शहरी आरोग्य सेवा, मुंबई, डॉ. प्रसाद भंडारी, सहसंचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई तसेच डॉ. अमोल बाग, राज्य कार्यक्रम व्यवस्थापक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांनी मार्गदर्शन केले.




बैठकीत छत्रपती संभाजीनगर व लातूर आरोग्य परिमंडळांतर्गत राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, शहरी प्राथमिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करणे, नागरिकांना दर्जेदार व सुलभ आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे, विविध आरोग्य योजनांची प्रगती, गुणवत्ता आश्वासन, आर्थिक व्यवस्थापन तसेच आरोग्य संस्थांच्या कार्यक्षमतेबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत आवश्यक सूचना व मार्गदर्शन करण्यात आले.

सदरील बैठकीस छत्रपती संभाजीनगर व लातूर परिमंडळातील आरोग्य उपसंचालक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, माता-बाल संगोपन अधिकारी, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा लेखा व्यवस्थापक, शहर कार्यक्रम व्यवस्थापक, शहर लेखा व्यवस्थापक, शहर गुणवत्ता आश्वासन समन्वयक, जिल्हा गुणवत्ता आश्वासन समन्वयक, पब्लिक हेल्थ मॅनेजर, एझ्ण कन्सल्टंट तसेच विविध कार्यक्रमांचे व्यवस्थापक उपस्थित होते. सदर आढावा बैठकीचे यशस्वी आयोजन आरोग्य विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांच्या वतीने करण्यात आले.

# वैजापूरात जेष्ठ नागरिक आयुष्यमान भारत कार्ड, उद्यम प्रमाणपत्र व एसआयआर जनजागृती शिबीर

वैजापूर दि.१३ (प्रतिनिधी)- येथील गोरख मापारी सेतू सुविधा केंद्र,तसेच सामाजिक कार्यकर्ते सोनू राजपूत मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ७०वर्ष वया वरील जेष्ठ नागरिकाना आयुष्यमान भारत कार्ड,महात्मा फुले आरोग्य कार्ड,तसेच युवकांना उद्यम प्रमाण पत्र, व एसआयआर मतदार यादी पुनरीक्षण बाबत माहिती मिळावी म्हणून नुकतेच संत सेना महाराज समाज मंदिरात जनजागृती शिबीर घेण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते सोनू राजपूत, धोंडीरामसिंह राजपूत ,गोरख मापारी यांनी उपस्थिताना वरील विषयाबाबत मार्गदर्शन करूनआवश्यक कागद पत्रांची

पूर्तता केल्यास मापारी सुविधा केंद्रातून प्रमाण पत्र उपलब्ध करून देण्यात येईल असे मार्गदर्शन केले.मतदार यादी पुनरीक्षण बाबत ही मार्गदर्शन करून मतदारांनी लवकरात लवकर नोंदणी करावी असे आवाहन केले.या समयी काही नागरिकांना प्रमाण पत्र व कार्ड वितरित करण्यात आले. या प्रसंगी

सोनू राजपूत मित्र मंडळ, गणेश महापुरे, प्रशांत त्रिभुवन, अभिजित लोखंडे,विकास पडवळ,राहुल गायकवाड,पंडित खरात,अभिषेक दाढे, काका लाडवाणी,मोहक निकम, प्रतीक अनर्थे, हिमांशू चव्हाण, शुभम लिंगायत यांनी सहकार्य केले.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये सलग ५ दिवस पावसाची शक्यता

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- जून महिन्यात ओढ दिलेल्या पावसाने जुलैच्या पहिल्या आठवड्यात राज्याला चांगलेच झोडपून काढले आणि धरणांच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली. मात्र, त्यानंतर पावसाने पुन्हा पाठ फिरवल्याने राज्यात उकाडा कमालीचा वाढला आहे. पेरणी केलेल्या शेतकऱ्यांचे डोळे आकाशाकडे लागले असतानाच, भारतीय हवामान विभागाने एक मोठा आणि दिलासादायक इशारा दिला आहे. येत्या ४ ते ५ दिवसांत कोकणासह संपूर्ण महाराष्ट्रात पुन्हा एकदा जोरदार पावसाचे पुनरागमन होणार आहे.

सध्या राज्यात अनेक ठिकाणी वातावरण कोरडे असून दुपारच्या वेळी उन्हाचा चटका चांगलाच जाणवत आहे. आजदेखील राज्यात अनेक भागात हलक्या पावसाची शक्यता असली, तरी वातावरण बहुतांश कोरडेच राहील. मात्र, मॉन्सूनचा कमी दाबाचा पट्टा सध्या हिस्सार, मेरठ, गोरखपूर ते थेट आसामपर्यंत सक्रिय आहे. तसेच, ३.१ किलोमीटर उंचीपर्यंत चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण झाली आहे. या हवामान प्रणालीमुळे आगामी ४ ते ५ दिवसांत राज्यातील बहुतांश भागांत पावसाचा जोर वाढणार आहे.

५ दिवस पावसाची शक्यता राज्यातील इतर भागांप्रमाणेच छत्रपती संभाजीनगरमध्येही पावसाची दडी आणि वाढलेल्या तापमानामुळे नागरिक हैराण झाले होते. मागील २४ तासांत शहरातील कमाल तापमान ३४.६ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २३.० अंश सेल्सिअसवर पोहोचले आहे. मात्र, इथल्या नागरिकांची आणि शेतकऱ्यांची पावसाची प्रतीक्षा आता संपणार आहे.

# आयुक्त यांनी लागू केली मनपाच्या व बाह्य स्त्रोत वाहनांसाठी मानक कार्यपद्धती

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या तसेच बाह्य स्त्रोत (आउटसोर्स) एजन्सीमार्फत कार्यरत 'छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सेवार्थ' असा उल्लेख असलेल्या सर्व वाहनांसाठी, यंत्रसामग्री, वाहनचालक व सुपरवायझर यांच्यासाठी मानक कार्यपद्धती लागू करण्यात आली आहे.

या कार्यपद्धतीचा उद्देश मनपाच्या सेवेत कार्यरत सर्व वाहनांचा सुरक्षित, शिस्तबद्ध व कार्यक्षम वापर सुनिश्चित करणे हा असून, वाहनचालकांकडे वैध वाहन परवाना असणे, वाहनामध्ये आरसी बुक, विमा, पीयूसी व फिटनेस प्रमाणपत्र यांसारखी आवश्यक कागदपत्रे ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच वाहन सुरू करण्यापूर्वी ब्रेक, साईड लाईट, इंडिकेटर, हेडलाईट, ब्रेकलाईट व टायर यांची तपासणी करणे तसेच ऑईल, कुलंट व बॅटरीची नियमित पाहणी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

प्रत्येक वाहनासाठी लॉगबुक ठेवून त्यामध्ये दिनांक, वेळ, प्रारंभ व समाप्ती किलोमीटर, प्रवासाचा उद्देश, इंधनाचा तपशील तसेच वाहनचालक व संबंधित अधिकारी अथवा सुपरवायझर यांच्या स्वाक्षऱ्यांची नोंद करणे अनिवार्य करण्यात आले आहे. याशिवाय वाहनांची नियमित सर्व्हिसिंग करून दर १५ दिवसांनी मेकॅनिकमार्फत तपासणी करणे, वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे, वाहने नो-पार्किंग क्षेत्रात उभी न करणे तसेच मद्यप्राशन करून वाहन चालविल्यास कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच महानगरपालिकेच्या मालकीच्या वाहनांवर 'छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका' तर बाह्य स्त्रोत एजन्सीच्या वाहनांवर 'छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सेवार्थ' असा स्पष्ट उल्लेख करणे बंधनकारक करण्यात आले असून, सर्व वाहनांवर प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या नियमानुसार ऐंइ नंबर प्लेट बसविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

आयुक्त अमोल येडगे यांनी सर्व विभागप्रमुख, संबंधित अधिकारी, वाहनचालक, सुपरवायझर व बाह्य स्त्रोत एजन्सींनी या मानक कार्यपद्धतीचे काटेकोर पालन करावे, असे निर्देश दिले असून, नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

(पान १ वरुन)

## भरधाव ट्रकच्या धडकेत तीन वारकरी...

पालखी मार्गावर लाखो वारकरी चालत असताना आणि ४० ते ५० हजार वाहने दिंडी प्रमुखांसोबत जात असताना, वाहतुकीचे योग्य नियोजन नसल्याचे समोर आले आहे. दोन दिवसांपूर्वी दिवे घाटात झालेल्या ६ तासांच्या वाहतूक कोंडीचा दाखला देत, पोलिसांनी याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप वारकरी आणि स्थानिक नागरिकांनी केला आहे.

अपघातग्रस्त वारकऱ्यांची उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी घेतली भेट : मृतांच्या वारसांना पाच लाख रुपयांची मदत

उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी तातडीने जेजुरी ग्रामीण रुग्णालयाला भेट देऊन जखमी वारकऱ्यांची विचारपूस केली.यावेळी त्यांनी उपचाराधीन वारकऱ्यांच्या प्रकृतीची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून घेतली तसेच जखमींना सर्वोत्तम वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना संबंधित प्रशासनाला दिल्या. अपघातात मृत्यू झालेल्या वारकऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत देण्यात येणार असून जखमी वारकऱ्यांवर शासनाच्या वतीने मोफत उपचार करण्यात येतील. तसेच आवश्यकतेनुसार आर्थिक मदतही उपलब्ध करून देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

## लाडकी बहीण योजनेतील ९२ लाख नावे....

आणि गरजू शेतकऱ्यांना केवळ तांत्रिक कारणे दाखवून कर्जमाफीतून बाद करण्याचा कट सरकारने रचला आहे. शिवसेना आणि भाजप यांच्यात अत्यंत चांगली मैत्री आहे. त्यामुळे त्यांच्यात अंतर्गत पातळीवर नेमके काय शिजत आहे. विधान परिषदेला दराडे का पडले याचे खरे कारण केवळ त्यांनाच ठाऊक असेल, असा टोलाही त्यांनी लगावला आहे.

दरम्यान विजय वडेट्टीवार यांच्या टीकेला भाजपचे प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी सडेतोड उत्तर दिले आहे. ''लाडकी बहीण योजनेत जवळपास १४ लाखांच्या आसपास पुरुषांची नावे आढळून आली असून, काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांनीच ही बोगस नावे योजनेत घुसविली,'' असा खळबळजनक आरोप कुलकर्णी यांनी केला.

''महायुती सरकारने ही योजना आणल्यापासून विरोधकांचे पोट दुखत आहे. या योजनेला खो घालण्यासाठी तुम्ही थेट न्यायालयाचे दरवाजे सुध्दा ठोठावले होते. वर्षानुवर्षे तुम्ही सत्तेत राहिलात, पण गरजू माता-भगिनींना कधी फुटकी कवडीही दिली नाही. आता आम्ही देतोय, तर तुमचे राजकारण सुरू झाले आहे,'' अशा शब्दांत कुलकर्णी यांनी काँग्रेसवर निशाणा साधला.

## सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी...

पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत याबाबतचा प्रस्ताव मांडला, त्यास सर्वानुमते सहमती दर्शवण्यात आली. त्यामुळे, सुनेत्रा पवार यांच्याकडे उपमुख्यमंत्रीपदासह पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाचीही जबाबदारी देण्यात आली आहे. मात्र, आता याच निवडीला राष्ट्रवादी पक्षातूनच आक्षेप घेण्यात आला आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या पक्षातील राष्ट्रीय अध्यक्ष पदावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आलं आहे. विशेष म्हणजे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील जेष्ठ नेते आणि राष्ट्रीय सचिव सच्चिदानंद सिंह यांनी थेट वकिलांमार्फत नोटीस पाठवून प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याने पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. पक्षाच्या अध्यक्षांसह वरिष्ठ नेत्यांना ९ जुलै रोजी त्यांनी ही नोटीस बजावली असून राष्ट्रीय अध्यक्ष पदाची निवडणूक पुन्हा घ्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

ज्या व्यक्तीने नोटिस पाठवली त्याने केवळ प्रसिद्धीसाठी हे केलेलं आहे, सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवड कायद्याला धरून आहे, असे राष्ट्रवादीचे सरचिटणीस सूरज चव्हाण यांनी म्हटले. राष्ट्रीय कार्यकारिणीत अध्यक्ष पदाची निवड झाल्यानंतर राष्ट्रीय अध्यक्षाला इतर निवडीचा अधिकार असतो, त्यानुसार प्रफुल पटेल यांची राष्ट्रीय कार्याध्यक्ष आणि सुनील तटकरे यांची महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष म्हणून निवड प्रक्रिया पार पडली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष निवडीवेळी नव्या संविधानाचा दाखल दिलेला आहे, तो चुकीचा आहे लवकरच आम्ही याबाबत बोलणार आहोत, असेही सूरज चव्हाण यांनी स्पष्ट केले.

## ऑपरेशन टायगर थांबणार नाही;....

आंदोलनाचा सोळावा दिवस आहे आणि त्यांनी फार लवकर पाठिंबा जाहीर केला,'' असा टोला त्यांनी लगावला.

ते म्हणाले की, देशातील युवक, शेतकरी, कामगार आणि उद्योजकांसाठी केंद्र व राज्य सरकार काम करत आहे. त्यामुळेच देशात एनडीए आणि महाराष्ट्रात महायुती सरकारला जनतेने पुन्हा सत्ता दिली आहे.

हिंदुत्वाच्या मुद्द्यावरही त्यांनी उद्धव ठाकरेंना लक्ष्य केले. ''रामरक्षा आंदोलन, नागपुरातील कार्यक्रम किंवा हिंदुत्वाचा मुद्दा त्यांना आता अनेक वर्षांनंतर सुचला आहे. काँग्रेससोबत इतकी वर्षे राहिल्यानंतर त्यांना हिंदुत्वाची आठवण झाली, हे उशिरा सुचलेले शहाणपण आहे,'' अशी टीका त्यांनी केली.

# १९ वर्षीय विद्यार्थ्याचा संशयास्पद मृत्यू

## नातेवाईकांकडून घातपाताचा आरोप, चौकशीची मागणी

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर शहरातील जय भवानीनगरजवळील एसटी कॉलनी परिसरात एका १९ वर्षीय विद्यार्थ्याचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. हर्षद मधुकर जाधव असे या विद्यार्थ्याचे नाव असून, रविवारी रात्री त्याचा मृतदेह राहत्या खोलीत गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. मात्र, त्याचे हात बांधलेले असल्याने नातेवाईकांनी घातपाताचा संशय व्यक्त केला आहे.



हर्षद मधुकर जाधव हा पार्ट-टाईम नोकरी करत शिक्षण घेत होता. रविवारी रात्री सुमारे १०.३० वाजण्याच्या सुमारास त्याचा मृतदेह आढळून आला. नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार, मृतदेह आढळला तेव्हा हर्षदचे हात घट्ट बांधलेले होते. यामुळे ही आत्महत्या नसून, त्याची हत्या करण्यात आल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून सत्य समोर आणावे आणि दोषींवर कठोर कारवाई करून आम्हाला न्याय मिळावा, अशी मागणी नातेवाईकांनी केली आहे. पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेऊन तपास करावा, अशी त्यांची अपेक्षा आहे.